प्रकरण : चार

# ‘सावट’ आणि ‘चारापाणी’ या कादंबऱ्यांतील अभिव्यक्तीविशेष

## प्रकरण – चार

# 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांतील अभिव्यक्तीविशेष

**प्रस्तावना :**

प्रस्तुत प्रकरणामध्ये रा. रं. बोराडे यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबरींचे अभिव्यक्तीविशेष यांचा विचार करावयाचा आहे. रा. रं. बोराडे यांच्या कादंबरीलेखनाचे स्वरूप, 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यातून प्रत्ययाला येणारे ग्रामीणत्व, कादंबरीचा कथाघाट, त्यांच्या कादंबरीतील पात्रे, संघर्ष, निवेदनशैली, भाषाशैली इ. घटकांच्या अनुषंगाने त्यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांचे अभिव्यक्तीविशेष लक्षात घ्यावयाचे आहेत.

**कथानक :**

कथानक हा कादंबरीचा गाभा मानला जातो. त्यामध्ये मुख्य कथाबीज महत्त्वाचे असते. अनेक घटनाप्रसंगांची संगतवार आणि कलात्मक साखळी मिळून हे कथानक बनते. एका प्रसंगातून दुसरा प्रसंग निर्माण होत असतो. त्यामुळे वाचकांची उत्कंठा वाढून पुढे काय? असे कुतूहल निर्माण होते. परिणामी कथानक गतिमान बनते. कथानकात प्रारंभ, विकास आणि शेवट यांना खूप महत्त्व असते. बापट-गोडबोले लिहितात, "...लेखकाने वाचकांच्या मनात कुतूहल निर्माण केले म्हणजे कथानकात बांदेसूदपणा येऊन कथानकाचे आकर्षणही वाढते. कादंबरीतील कथानक म्हणजे एका किंवा अनेक पात्रांच्या जीवनातील विवक्षित प्रसंगांची 'चतुराईची गुंफण' होय. लेखक एका प्रसंगातून दुसऱ्याचे विकसन करीत असतानाच उत्कंठेचे बीजही पेरीत असतो."[१] म्हणजेच कादंबरीतील पात्रांच्या जीवनात येणारे अनेक प्रसंग काही कौशल्याने एकमेकांत गुंफणे हे लेखकाचे कसबच असते. कथानक चित्तवेधक होणे महत्त्वाचे असते. वाचकाला खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य कथानकात असणे आवश्यक असते.

**'सावट' कादंबरीचे कथानक :**

'सावट' या कादंबरीच्या कथनकाचा विचार करता विषयमर्यादा आणि आशय अभिव्यक्तीचा विचार करता या कलाकृतीलाही लघुकादंबरीचा घाट प्राप्त होतो. तसे 'सावट' चे कथानक ग्रामीण कुटंबातील भावनात्मक पेच व ताणतणावाला केंद्रस्थानी ठेवून ते सरळ मार्गाने पुढे जाणारे आहे.

या कथानकातील नायक दामाजी हा शहरातील कॉलेजात प्रथम वर्षाला शिकत

असतो. अशाच एका सायंकाळी त्याचे वडील आप्पाजी त्यांच्या खोलीवर येतात ते दबलेल्या अवस्थेत दामाजीने छेडताच वडील सांगतात, त्याच्या बहिणीचा-पमाचा सासरा गावी येऊन गेला आणि दामासाठी त्याची भाची करावी असं सांगून गेल्याचं सांगतात. दामू मात्र शिक्षण सोडून लग्न न करण्याचा निश्चय सांगतो. यास वडिलांचा पाठिंबा होता. पमाचा सासरा हे लग्न होण्यासाठी डावपेच सुरू करतो. पमाचा सासरा प्रथमतः दामूला खोलीवर जाऊन लग्नाची धमकी देतो. पण अडाणी मुलीशी लग्न करायला दामू तयार नसतो. त्यामुळे सासरा पमाला माहेरी आणून घालवतो. मावसभाऊ जयवंतराव याच्या मदतीने पमाला परत सासरी पाठविले जाते.

दामाजी कसातरी अभ्यासावर लक्ष केंद्रित करीत असतो. अचानक एकेदिवशी "पमाचा सासरा तुला हितनं पळवून न्हेनार हाय म्हनं, आपल्या भाचीसंग तुजं बळंबळं लगीन लावनार हाय म्हनं" (पृ. ६०) असं जयवंतरावाकडून दामाजीला समजते. तेव्हापासून दामाजी मित्राचा आधार घेऊन सावधपणे वावरू लागतो. एकेदिवशी पमाच्या सासरचा यशवंता त्या शहरात दामाजीला दिसतो. आणखी दोन इसम त्याच्याबरोबर असल्याने हे पळवून न्यायलाच आले असणार अशी भीतीत वाढ होते. पटकन तो मित्रांना गाठतो. मित्रांनाही आधी पटत नाही, परंतु नंतर मात्र ते सर्वजण एक टिनपाट हॉटेलात यशवंताला गाठतात. मारामारीच्या आवेशाने पमाच्या सासऱ्याला व यशवंताला हातकड्या घालण्याची धमकी देतात. "दामाजीराव, तुम्ही हे बरं केलं नाही ह्याचे परिणाम लई वाईट व्हतेल, आत्ताच सांगून ठेवतो." (पृ. ६५) असे यशवंता रागाने म्हणतो आणि दामाजीच्या भीतीमध्ये आणखी वाढ होते.

या घटनेने पमाचा सासरा चिडतो अन् तो मुलाचे दुसरे लग्न करतो अन् पमाला सवत आणतो. अशाप्रकारे शहाला काटशह न देता आल्यानं या दोन कुटंबातील संघर्ष विकोपाला जाऊन परिणामी पमाचं जीवन उध्वस्त होते. अन् दामाजी अखेर इच्छेविरूद्ध शिकायला शहराकडे जायला निघतो, येथे ही कादंबरी संपते.

रचनातंत्राच्या दृष्टीने या कादंबरीच्या कथात्म-घाटाचा विचार करता तिच्या सरळमार्गी कथानकाने व भावनात्मक गुंतागुंतीने तिला विशिष्ट अशी कलात्मक पातळी लाभलेली जाणवते. येथील नात्यागोत्यातील गुंतागुंतीची घट्ट वीण उकलण्याच्या प्रयत्नात ही लघुकादंबरी वाचकाला गुंतवून टाकते. या कादंबरीत कौटुंबिक स्वरूपाचा संघर्ष आहे पण त्याचा रोख सामाजिक मूल्यव्यवस्थेशी आहे. अत्यंत साधे, सरळ कथानक असलेल्या या कादंबरीतून

खेड्यातील नात्यागोत्याच्या कचाट्यात सापडलेला माणूस हतबल कसा होतो व लाचार बनतो. उदा. दामाजीचे आई-वडील.

'सावट' चे कथानक, दामाजीच्या उमेदीच्या काळात त्याचं भावविश्व गुरफटून टाकणारी व्यथा घेऊन येत असलं तरी ही अदृश्य व्यथा चित्रित होते ती पमाची. पमाच्या व्यथेने वाचक अंतर्मुख होतात.

**'चारापाणी' चे कथानक :**

'चारापाणी' या कादंबरीचा विषय तसा आटोपशीर, ज्वलंत प्रश्नाचा वेध घेणारा आणि ज्वलंत प्रश्नाचे आकलन करून त्यावर उपाय सुचविणारा आहे. या कादंबरीच्या कथानकात सुरूवातीला शहरात शिकायला गेलेला सुखदेव एम. ए. ची परीक्षा संपवून परत आपल्या गावी येतो. फाट्यावरून गावापर्यंत येतानाच त्याला दत्तू घायवटाची गाडी भेटते. गावात काम नाही. बैलांना आणि माणसांना प्यायला पाणी नाही. म्हणून गाडीत संसार भरून भकाळी गेलेल्या पोटाची बैलं गाडीला जोडून बायको-पोरासह गाव सोडून जात असताना त्याला भेटतो. आता कुठं जायचं ? हेही दत्तूला माहीत नाही. जिथं कुठं जनावरांना चारा आणि प्यायला पाणी मिळेल तेथे तो जाणार असतो. सुखदेव गावाजवळ येतो तसतशी दुष्काळाची तीव्रता त्याला अधिक जाणवू लागते.

रस्त्याच्या कडेला मेलेलं जनावर पडल्याने घाण वास सुटलेला होता. "धगधगीत उन्हात वाळत घालावं तसं दिसणारं गाव. माणसांचा फारसा वावर नाही. एखादा-दुसरा माणूस इकडून तिकडं जाताना किंवा समोरून येताना दिसे. आपल्याच व्यापात गुरफटल्यावानी, कसल्यातरी ओझ्यानं वाकल्यावानी दिसणारा." (पृ. ३) दुष्काळाचा माणसांवर इतका आणि असा परिणाम होतो ? असा सुखदेवला प्रश्न पडतो.

घरी गेल्यावर "एखादी मोलाची वस्तू आणावी तसं तिनं घरातून तांब्यात पाणी आणलं." (पृ. ३) आईनं दिलेलं पाणी तो एका दमात पिऊन टाकतो. त्याला प्रवासाचा खूप कंटाळा आलेला होता. अंघोळीसाठी पाणी काढण्यास तो मायला सांगतो. त्याची नजर टाळीत राहीबाई म्हणते, "आजच्या दिवस न्हाई अंघोळ केली तर जमायचं न्हाई व्हय ?" नंतर म्हणते, "बर, तुला आमच्यावानी अंघोळ कर म्हननंबी बरं न्हाई आन् तुला ते जमायचंबी न्हाई." (पृ. ४) असे म्हणत ती त्याच्या चेहऱ्याचा अंदाज घेते. ती सुखदेवला बाजेवर बसून करायच्या अंघोळीविषयी कल्पना देते. सुखदेव बाजंवर बसून अंघोळ करताना माय पाण्याचा प्रत्येक थेंब टोपलीत पकडायचा

केविलवाणा प्रयत्न करते. येथे पाण्याच्या प्रत्येक थेंबाचं महत्त्व लेखक कृतीतून पटवून देण्याचा प्रयत्न करतो. येथे शहरी वाचकाला अवास्तवतेचा स्पर्श जाणवेलही. परंतु हे जाणवणारे अवास्तव हेच वास्तव आहे. या वास्तवातच येथील भीषणता दडलेली आहे.

सुखदेव जनावराच्या गोठ्याकडे जातो तेथे जनावरं कमी झालेली पाहून जनावरं विकली की काय असा प्रश्न विचारल्यावर मायच्या डोळ्यात पाणी येते. वडील नारायणराव येतात. ''त्यांच्या डोक्यावर कडब्याचा भारा होता. भाऱ्यात कडब्याच्या दहा-बारा पेंढ्या असतील. पाचोळा झडलेल्या एखाद्या फिरस्त्यानं कुठून तरी जमा करून आणाव्या तशा दिसणाऱ्या.'' (पृ. ६) तीस एकर शेती असणाऱ्या आपल्यासारख्यांवर अशी वेळ यावी ? मग सामान्यांचं काय हाल असतील ? हा कडबाही मिळत नाही. तीन रूपयाला एक पेंढी. मग तो पुरवायचा तरी कसा हा प्रश्न आहेच. येथे जनावराच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचं त्याला वडिलांकडून कळते.

पाऊस नाही, त्यामुळे चारा नाही, परिणामी जनावरं, बैल विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर येते. बाळबा शेलार सारख्या शेतकऱ्याला बैल विकायला नको वाटते. कसायाच्या हाती बैलं द्यायला त्याचं मन धजत नाही. तो बैलांच्या गळ्यात दाखले बांधतो. सर्वजण त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न करतात. ऐपत असेल त्यानं या बैलांचे मालक व्हाव असं तो सांगतो. आबाराव शेळके येतो आणि बैलांच्या गळ्यातील दाखले सोडून बाळबाच्या खिशात घालतो. तो बाळबाला म्हणतो, ''हे दाखले तू आपल्या घरात न्हेऊन ठेव आन् तुजे जित्राब हे आत्ताच्या आत्ता माज्या मळ्यात आणून सोड, माज्या मळ्यातल्या बैलाबरोबर ते खातेल पितेलबी आन् त्येंच्यासंगं कामबी करतेल. तुज्या शेतात चारा झाल्यावर अगर जवा तुला न्येनला वापस आनायचं आसंल तवा खुशाल वापस घिऊन ये.'' (पृ. १५) गावातील लहान शेतकऱ्यांचे शोषण करणारा आबाराव शेळके एवढा परोपकारी कसा झाला याचं कोडं मात्र गावकऱ्यांना उलगडत नाही.

तसेच गावात निर्माण झालेली पाण्याची तीव्र टंचाई, पाण्याच्या टँकरवर बायका-माणसांची उडणारी झुंबड, ग्लासभर पाण्यासाठी रामा सुराशेची बायको विहिरीत पडणे, लमाण तांड्यावरील बाळंत झालेल्या स्त्रीला बाळाच्या अंगावरील नैसर्गिक आवरण धुण्यासाठी पाणी न मिळणे या साऱ्या घटनांनी सुखदेव अस्वस्थ होतो. जनावरांच्या चाऱ्यासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी सुखदेव मित्र मल्हारीसह तहसीलदार, बी. डी. ओ., साखर कारखान्याचे चेअरमन,

शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते यांना भेटतो. त्यांच्याकडे चारा आणि पाणी यांची मागणी करतो. पण हेही लोक आपल्या मर्यादा सांगतात.

शासनाच्या उपाययोजना मलमपट्टीच्या स्वरूपाच्या असल्याचं त्याच्या लक्षात येतं. ''शेतकऱ्यांचे बैल जगले काय अथवा मेले काय, साखर कारखान्याच्या चेअरमनला त्याचं काय सोयरसुतक आहे ? बैलढोरांचा आणि साखर कारखान्याचा संबंधच काय ? बैलांच्या मदतीशिवाय उसाचं उत्पादन करता येतं, बैलांच्या मदतीशिवाय उसाची वाहतूक करता येते.'' (पृ. ९६-९७) हेही सुखदेवच्या लक्षात येते. शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते पळवाटा शोधतात.

दरम्यानच्या काळात सर्जेराव शिंदेनं आपले बैल तसेच शेत आबारावाला देऊ नये म्हणून विरोधात असलेला मुलगा जयराम आबारावाचा कडबा पेटवितो. गावातील लोकांच्या प्रयत्नांने निम्मा कडबा वाचतो. आता आबाराव शेळकेही जयरामला स्वाधीन केल्याशिवाय गावातील बैल संभाळी घ्यायला तयार नसतो. शेवटी सुखदेव सर्व शेतकऱ्यांना त्यांच्या चुका समजावून सांगतो आणि 'मेखा मारो' आंदोलनाचा मार्ग दाखवतो. दुष्काळपीडित शेतकरी आपल्या बैलासह तालुक्याच्या वाटेला लागतात. वाटेवरचे लोक कुतूहलाने या बैलांकडं बघत असतात. त्यांच्या शिंगावर बांधलेल्या मागण्यांच्या पाट्या वाचत असतात. या पाट्या म्हणजे जणू त्या मुक्या प्राण्यांचं मनच होतं. ती मने आक्रंदत होती. मागणी करीत होती -

''आम्हाला चारा द्या, आम्हाला पाणी द्या''
''आम्हाला खाऊ नका, आम्हाला खाऊ घाला''
''चार जमवा, आम्हाला जगवा''
''आम्ही जगलो तरच शेतकरी जगंल'' (पृ. ९९)

अशा पाट्या बांधलेले बैल तहसीलच्या वाटेला लागतात. अशाप्रकारे रा. रं. बोराडे 'चारापाणी' या कादंबरीचा शेवट कलात्मकतेने करतात.

अशा स्वरूपाचे हे कथानक अपूर्ण वाटते. काही दुव्यांची धरसोड करणारं असलं तरी फक्त न्याय हक्कासाठीच्या आंदोलनाचा मार्ग स्वीकारणारं म्हणून महत्त्वाचं ठरतं. म्हणून कथानक अपूर्ण असले तरी पुढे घडणाऱ्या संघर्षाचा कसाही अंदाज बांधला तरी त्या कथानकाला पूर्णत्त्व येऊ शकत नाही. पुढे कदाचित या शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य होतील. त्यांना चाराही मिळेल. परंतु हा चारा किती दिवस पुरेल ? पुन्हा पुढे काय ? पाण्याच्या प्रश्नाचं काय ? हे वर्ष

संपलं. पुढं दुष्काळ पडणार नाही कशावरून ? असे अनेक प्रश्न वाचकांच्या मनात निर्माण करून या कादंबरीचे कथानक संपते.

'चारापाणी' विषयी अविनाश डोळस लिहितात, "दुष्काळात शेतकऱ्यांचे प्रश्न त्यांनी निवडून दिलेल्या सरकारने सोडवायचे असतात हा नवा लोकशाहीने दिलेला विश्वास तो करून देतो. सरंजामशाहीच्या प्रवाहातून बाहेर पडण्याचा एक भाग म्हणूनही बोराड्यांची ही कादंबरी मला महत्त्वाची वाटते"[२] याची साक्ष रा. रं. बोराडे यांची 'चारापाणी' ही कादंबरी देते.

या कादंबरीच्या कथानकात अनुषंगिक, कायमस्वरूपी परंतु किरकोळ; वरवरचा वाटणारा ज्वलंत प्रश्न हाताळला आहे. येथे बोराडे ग्रामीण साहित्यात आजपर्यंत न आलेल्या प्रश्नांचा म्हणजे शेतीच्या, शेतकऱ्यांच्या आणि ज्या घटकाच्या - बैलाच्या आधारावर शेतकरी जगतो व इतरांना जगवितो तो मुलभूत घटक असलेला बैल एवढ्या व्यापक प्रमाणात ग्रामीण साहित्यात अभावानेच येतो. ती उणीव 'चारापाणी' ने भरून काढलेली आहे.

तसेच जनावराच्या चारापाण्याचा प्रश्न हाताळताना सुखदेव, त्याचे वडील, सुखदेव - आबाराव शेळके, आबाराव शेळके-गावकरी, सुखदेव आणि शासन, सर्जेराव - जयराम शिंदे या पितापुत्रांचा संघर्ष, आणि कौटुंबिक ताणतणाव, शासकीय पातळीवरील संघर्षरूपाची मूळ प्रश्नाच्या अनुषंगाने निर्मिती करणाऱ्या या कादंबरीचा रचनात्मक दृष्टीने विचार करता तिचा रचनाव्यूह तसा निर्दोष वाटतो. दुष्काळसदृश्य परिस्थिती, त्यामुळे निर्माण झालेले विविध पातळीवरील प्रश्न, शेतीवर राबणाऱ्या बैल या घटकाच्या चाऱ्याचा प्रश्न या सर्व बाबीवर उपाय शोधण्यासाठी व त्यानिमित्ताने मदत घेण्यासाठी सुखदेव शासकीय घटकांची भेट घेतो. ह्या घटनांचा व शासकीय अधिकारी, तहसीलदार, बी. डी. ओ. चेअरमन यांच्या भेटीतील वार्तालाप इ. घटनाप्रसंगातून घडणारे भ्रष्टाचाराचे दर्शन यामुळे या लघुकादंबरीच्या कथानकाचा रचना घाट प्राप्त होत जातो.

'चारापाणी' बद्दल रा. रं. बोराडे यांना अभिप्राय देताना मधू जामकर लिहितात, "चारापाण्याची समस्या ही ग्रामीण भागातल्या पशूधनाच्या अस्तित्वाशी निगडीत असलेली समस्या टिपताना तुम्ही माणसातल्या पशुवृत्तीचा आधार घेत नव्या दालनाची रूपरेषा रेखाटली आहे हे विशेष. शेतकऱ्यांचे मग तो कोरडवाहू की बागाईतदार असो अस्तित्व पशुधनावर असते म्हणून 'चारापाणी' या समस्येकडे गांभीर्याने बघणे व वेळीच ही समस्या सोडविणे आवश्यक आहे हे तुमचे मत पुन्हा मानवी मनाच्या समस्येशी निगडीत आहे."[३] येथे सिद्ध

होते की लेखक हा शेवटी मानवी जीवनावरच लिहित असतो. कारण प्राणीजीवन हे मानवी जीवनाच्या अस्तित्वाशी निगडीत असते. 'बैल' या घटकाच्या समस्येवर ही कादंबरी प्रकाश टाकत असली तरी शेवटी तो बैल शेतकऱ्यांच्या जगण्याशी संबंधित आहे.

'सावट' आणि 'चारापाणी' या रा. रं. बोराडे यांच्या दोन्ही कादंबरीत सुरूवात, मध्य आणि शेवट विशिष्ट पद्धतीने केले आहेत. दोन्हीही कथानके गतिमान आणि वाचकांना खिळवून ठेवणारी आहेत.

**पात्रचित्रण :**

व्यक्ती तितक्या प्रकृती (Many men and many mind) या नात्याने रा. रं. बोराडे यांनी आपल्या कादंबऱ्यातून विविध नमुन्याच्या व्यक्ती रेखाटलेल्या आहेत. कादंबरीत पात्रचित्रण अत्यंत महत्त्वाचे असते. पात्रचित्रणाशिवाय कादंबरीच्या कथानकाला आकार येऊ शकत नाही. वातावरण निर्मिती, निसर्गचित्रण या घटकातूनही पात्रचित्रण विकसित होत असते. कादंबरीतून व्यक्तीचा सुसंगत विकास होणे अत्यंत गरजेचे असते. पात्रांच्या सभोवतालचे वातावरण, त्याचा पात्रावर होणारा परिणाम आणि त्या पात्राची होणारी मानसिक उकल, तसेच त्यांच्या भावभावना यांचे चित्रण कादंबरीत गरजेचे असते. इतकेच नव्हे तर कादंबरीचे यशापयश कथानक, प्रसंगचित्रण, या वातावरणनिर्मिती इतकेच पात्रचित्रणावर अवलंबून असते. या अनुषंगाने 'सावट' आणि 'चारापाणी' तील पात्रचित्रणाचा विचार करू.

'सावट' ही कादंबरी दामाजी, त्याची आई, वडील - अंबादासराव (आप्पाजी), पमाचा सासरा बळवंतराव या पात्राभोवती फिरत राहते. कादंबरीतील सामाजिक समस्येचे केंद्रस्थान हे पमाभोवतीच केंद्रीत राहते.

**दामाजी :**

'दामाजी' हा या कादंबरीचा नायक. त्याची होणारी घुसमट आणि नात्यागोत्याचे भावबंध टिकविताना त्याचा होणारा कोंडमारा, असे असले तरी दामाजी हा पुरोगामी विचाराचा पुरस्कार करणारा, नव्या जीवनमूल्याचा स्वीकार करणारा परंतु या मूल्यांचा स्वीकार करताना जुन्यांचे बंध तुटणार कसे नाहीत याची दक्षता घेणारा आहे. तसा हा दामाजी शिक्षणासाठी शहरात राहणारा असला तरी तो आपले गाव, गावची माती, ग्रामसंस्कृती जपणारा, नात्यागोत्यापायी जखडून गेलेला तरूण आहे.

दामाजी प्रकाशने दिलेला सल्ला ऐकून घेतो, परंतु, "संसारातले सूर संवादी निघत

राहावेत म्हणून वरच्या जातीतल्या सुशिक्षित मुलीशी लग्न करण्याचा प्रकाशचा विचार, मला पचव्या-मानवण्यासारखा नव्हता. तरीही आपलं शिक्षण पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत आपण लग्नच करायचं नाही.'' (पृ. ३४) असे दामाजी मनात ठरवून टाकतो. यावरून त्याची विचार करून निर्णय घेण्याची वृत्ती दिसून येते.

दामाजी तसा समजूतदार, विचाराने परिपक्व असलेला आणि सामाजिक मूल्ये जपणारा असा आहे. त्याचे प्रत्यंतर पुढील प्रसंगातून येते. 'आपल्या लग्नासाठी बहिण, पमाच्या सासऱ्याने तिला वेठीस धरून त्याच्या आई-वडीलांना पेचात टाकलेले आहे. आपल्यामुळे आपले कुटुंब अडचणीत येणार नाही याची त्याला जाणीव आहे. लग्नासंदर्भात वडिलांनी विचारताच तो म्हणतो, 'मी तुमच्या शब्दाबाहेर नाही' वास्तविक पमाच्या सासऱ्याच्या भाचीशी लग्न केले तर अशिक्षित मुलगी गळ्यात पडेल तसेच शिक्षणाचाही बट्ट्याबोळ होईल लग्न न करावं तर बहिणीला सासरी त्रास होईल असा तो कैचीत सापडलेला आहे. याप्रसंगी तो समंजसपणे वागतो.

अशाप्रकारे आपल्या कौटुंबिक परिस्थितीमुळे दामाजीला अकाली प्रौढत्व आलेले दिसते. स्वतःच्या लग्नाबाबत तो मामा, मावसभाऊ जयवंतराव, मित्र प्रकाश, मेव्हणे माणिकराव या सर्वांचा तो सल्ला घेतो. वास्तविक पमाच्या सासऱ्याची भाची नाकारणे ही बाब महत्त्वाची नसून ती स्वीकारल्याने, तिच्याशी लग्न केल्याने जीवनाची वाताहत होत आहे, ते उध्वस्त होते आहे ही त्याची जाणीव अत्यंत महत्त्वाची आहे. असा हा दामाजी नव्या व जुन्या जीवनमूल्याच्या सीमारेषेवर उभा असलेला दिसून येतो.

दामाजी शिक्षण पूर्ण झाल्याशिवाय लग्न करणार नाही. या त्याच्या निर्णयासंबंधी सुधा जोशी यांचे मत महत्त्वाचे वाटते. त्या म्हणतात, ''ह्या कादंबरीमुळे दलित वाङ्मय एक पायरी तरी निश्चित वर चढले आहे. इतके दिवस त्यांच्यावरील अत्याचाराबद्दलचे लिखाण आपण वाचत होतो. आता त्यांच्या लेखनातून शिक्षणासाठी लग्न न करण्यासारखे विषय हाताळले जाऊ लागल्यावर त्यांचीही उन्नतीच्या दिशेने वाटचाल होत आहे असे म्हणायला हरकत नाही.''[४] हे 'सावट' या कादंबरीचे वेगळेपण म्हणता येईल. खेड्यात मुलामुलींची लग्ने कायद्याने ठरवून दिलेल्या वयाच्या आधीच केली जातात. दामाजीने तर हे वय ओलांडलेले असते. या दृष्टीने सुधा जोशी यांचे मत महत्त्वाचे वाटते. म्हणून दामाजी हे पात्र अधिक जिवंत वाटते.

**अंबादासराव :**

अंबादासराव हे कादंबरीभर आप्पा या नावानेच ओळखले जातात. ते दामाजी आणि पमाचे वडील आहेत. आप्पा अशिक्षित आहेत, साधेभोळे आहेत परंतु भाबडे नाहीत. नात्यागोत्याच्या समस्या न ताणता-तुटता सुटल्या पाहिजेत ह्या विचाराचे ते आहेत. ग्रामजीवनातील जुनेपणाचे संस्काराने युक्त असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे असे असले तरी आपल्या मुलाने शिकावं-सवरावं, आपला विकास करून घ्यावा त्यासाठी ते मुलगा दामाजीच्या पाठीशी उभे राहतात. मुलाने शिकावे ही त्यांची तीव्र इच्छा आहे. पण याचबरोबर त्याच्या शिक्षणामुळे स्वतःच्या मुलीचा- पमाचा बळी देणंही त्यांना मान्य नाही. म्हणूनच पमाच्या सुखासाठी दामाजीने तिच्या सासऱ्याची अडाणी भाची स्वीकारावी हा त्यांचा अंतिम हेतू नंतर अधिक स्पष्ट होतो. ते एके ठिकाणी म्हणतात. 'लग्न जमवून ठेवलं तर चालणार नाही का? कारण आपले केस त्यांच्या हातात गुंतलेत.' आणि दामाजीला सल्लाही देतात की, 'पमाच्या सासऱ्याला लागंल असं काही बोलू नको.'

एकूणच आप्पाजींना नात्यागोत्याबद्‌दल अधिक प्रेम आहे. एका प्रसंगात जयवंतरावला ते म्हणतात, ''जयवंता, लेकी-बाळीचे मामले अश्यानं मिटणं लई अवघड असतं.'' (पृ. ४७) याबरोबरच आप्पा जीवनातील व्यथा-वेदनांनी ग्रस्त व अगतिक झालेले आहेत. पमाला तिचा सासरा सवत करून आणतो तेव्हा आप्पांकडे गुडघ्याला मिठी मारून गप्प बसण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. अशाप्रकारे नात्यागोत्याच्या भावबंधात व कर्तव्याच्या जोखडात अडकलेली अशी ही आप्पांची व्यक्तिरेखा आहे.

**बळवंतराव :**

स्वार्थी, सरंजामी वृत्तीचे, आडदांड, बेरकी व्यक्तिमत्त्व म्हणून रा. रं. बोराडे यांनी आपल्या कादंबरीत हे पात्र रेखाटलेले आहे. आपल्या बोलण्याने, कृतीने तो कादंबरीतील सर्व पात्रांवर जरब बसवितो. तो कुणाचा मुलाहिजा ठेवत नाही. आणि पर्वाही करीत नाही. याचे प्रत्यंतर, तो दामाजीला भेटायला महाविद्यालयात येतो तेव्हा येते. तो महाविद्यालयातील दामाजी शिकत असलेल्या वर्गात जाऊन विचारतो, 'वाकडीचा दामाजी हितं हाये का ओ?'' (पृ. ११) तेव्हा प्राध्यापकासह सर्व वर्ग हसतो. त्यावेळी दामाजीचा सासरा प्राध्यापकालाही झापतो. ''खेड्यातला माणूस दिसला म्हणून त्याची पोरापोरीदेखत टर उडविताव व्हय ? हेच कालीजमधल्या पोरापोरींना तुमी शिकताव वाटतं ?'' (पृ. १२) अशा शब्दात तो बोलतो.

असा हा सरंजामी वृत्तीचा व बेदरकार बळवंतराव होय.

बळवंतरावाच्या नसानसात हा सरंजामीपणा भिनलेला आहे. उर्मटपणा आणि बिनधास्त मनोवृत्तीसुद्धा त्याच्याकडे आहे. शिक्षण संपल्याशिवाय लग्नाचा विचार नाही हे समजताच, "पमाचा सासरा भडकला होता. संतापाच्या भरात त्यानं पमाला माहेरी पाठवून दिलं होतं. आपला सांगावा आल्याशिवाय परत सासरी न येण्याविषयी तिला बजावलं होतं" (पृ. ३१-३२) दामाजीचे मित्र हातकड्या घालण्याची धमकी देतात तेव्हा तो पमाला सवत आणतो. तरीही निर्लज्जपणे म्हणतो, "एवीतेवी तुमी आमाला हातकड्या घालणारच व्हताव, तर पमाला सवत आनून मगच तुमच्याकडनं हातकड्या घालून घ्याव्या म्हनलं." (पृ. ७७) पमाला न्यायला आल्याचं कारण 'माय आजारी आहे' असं सांगताच म्हणतो, "लेकीला सवत आनल्याचा हितका त्येंनी धसका घेतलाय ?" (पृ. ७४) यातून त्याचा निर्ढावलेपणा व्यक्त होतो. याविषयी द. ता. भोसले लिहितात. "'सावट' कादंबरीत तर दामाच्या बहिणीच्या सासऱ्याच्या स्वभावाचे सारे बोचणारे रंग त्या पेचात मिसळले गेल्याने ती एका हट्टी व आडदांड अशा व्यक्तीची कथा वाटते. कधी कधी तर जखमी व हतबल झालेल्या उंदराबरोबर बलदंड मांजराने सावधपणे खेळत बसावे; तसा हा प्रकार वाटतो."५ बळवंतरावामुळे पमाचा संसार उध्वस्त होतो. तो सर्वांना दुःखी करतो. दामाजीच्या शिक्षणात अडथळा आणतो. त्याचे खलप्रवृत्तीचे पात्र चित्रण करण्यात लेखकास यश आले आहे.

हा बळवंतराव स्त्रीकडे नेहमीच तुच्छतेने पाहणारा आहे. तो स्वतःच्या घरच्या लक्ष्मीलाही गोठ्यातील गाय समजतो. स्त्रीकडे पाहण्याच्या तुच्छतेचा, घृणास्पदतेचा त्याचा दृष्टिकोन पुढील प्रसंगातून स्पष्ट होतो. तो दामाजीला म्हणतो, "तुमी एकदा वस्तू बघून घ्या, मग पासनापासाचं आमला सांगा." (पृ. १६) अशा स्वरूपात बळवंतराव स्त्रीचा वस्तू म्हणूनच उल्लेख करतो. सरंजामशाही विचारसरणीत स्त्रीला वस्तू म्हणूनच ओळखले जाते. त्याचेच प्रतीक म्हणजे 'सावट' कादंबरीतील सरंजामी वृत्तीचे सावट धारण करणारा बळवंतराव होय असेच म्हणता येईल.

'चारापाणी' या कादंबरीत सुखदेव, आबाराव शेळके, सुखदेवचे आई-वडील - राहीबाई-नारायणराव, मल्हारी इ. व्यक्तिरेखा येतात.

**सुखदेव :**

हे पात्र 'चारापाणी' कादंबरीचा नायक आहे. हा पदवीधर विद्यार्थी, ग्रामीण विद्यार्थी

संघटनेचा नेता, यावरून तो होतकरू, चौकस बुद्धीचा असल्याचं ध्यानात येते. शिक्षणामुळे त्याला आपल्या हक्क, अधिकारांची जाणीव झाली आहे. म्हणून तो एके ठिकाणी म्हणतो, "मी एक शेतकऱ्याचा मुलगा आहे. तुम्ही नडलेल्या, पीडलेल्या या शेतकऱ्यांचे शोषण करता आहात. तुमच्याविरूद्ध लढण्याचा मला निश्चितच अधिकार आहे." (पृ. २४) असे सुखदेव आबाराव शेळकेला स्पष्टपणे सांगतो. शासनाच्या अनेक घटकांना भेटून त्यांच्याकडे जनावरांच्या चारापाण्याची मागणी करतो. सर्वजण त्याला ढोंगी, सत्तापिपासू वाटतात. भ्रष्टाचाराने बरबटलेले हे अधिकारी, त्यांना दुष्काळाची झळ पोहोचणार कशी ? ती फक्त सर्वसामान्यांनाच असते ही जाणीव त्याला आहे. दुष्काळानं हतबल झालेल्या शेतकऱ्यांना उभं करण्याचं त्याचं ध्येय, त्या ध्येयासाठीच सतत धडपडत राहतो. शेवटी 'मेखा मारो' आंदोलनाचा मार्ग स्वीकारून शेतकऱ्यांना हक्कांची जाणीव देतो. तसेच लोकशाही शासनालाही जाणीव करून देतो की जनतेचे प्रश्न हे जनतेने निवडून दिलेल्या सरकारने सोडवायचे असतात. भीमराव वाघचौरे सुखदेव विषयी म्हणतात, "... शोषितांचा प्रतिनिधी म्हणून रेखाटले गेलेले त्याचे चित्र अत्यंत संयमी, वैचारिक बैठक असलेले आणि सर्वव्यापी दृष्टी असलेले असे होते."[६] हे विधान योग्य वाटते कारण सुखदेव हाही 'सावट' मधील दामाजीप्रमाणे संयमी, वैचारिक भूमिका आणि सर्वसमावेशक दृष्टी असलेला असाच आहे.

**आबराव शेळके :**

'चारापाणी' मध्ये आबाराव शेळके हे पात्र खलप्रवृत्तीचे म्हणून चित्रित झाले आहे. आबाराव हा धनसंपत्तीने गडगंज असा सावकार. हे पात्र डोळ्यासमोर येते ते बाळबा शेलारची बैलं संभाळी घेताना. गावचा पिढीजात शोषक म्हणून या पात्राची निर्मिती रा. रं. बोराडे करतात. सुखदेव गावकऱ्यांच्या बाजूने परवानगी न घेता त्याच्याशी भांडतो तेव्हा तो सुखदेवला म्हणतो, "ज्यांचे बैल माज्या शेतात राबायलेत त्यांनी तुमाला - रदबदली करायला माज्याकडं धाडलंय का?" (पृ. २४) आबारावाची शोषण करण्याची पद्धतच भिन्न आहे. तो बाळबाला म्हणतो, "बाळबा, तुज्या बैलांच्या गळ्यातले दाखले काढून घेऊन त्येचा मालक व्हायला म्या एवढा नीच हाय व्हय रं ?" (पृ. १५) असं गोड बोलून तो इतर शेतकऱ्यांचीही मने जिंकतो. तसा तो आतल्या गाठीचा आहे.

जयरामने कडबा पेटविल्यावर मदत केलेल्या गावकऱ्यांना तो म्हणतो, "येळंला धावून आलाव लई बरं वाटलं मला. जावा आता लई दमला आसताल." (पृ. ८८) यातून

त्याचा बेरकीपणा व्यक्त होतो. जयरामला स्वाधीन करण्याची अट घालताना तो गावकऱ्यांना म्हणतो, ''त्याच्या बापाकडं तुमी जावा. त्या जयरामला माज्या सोधान कर म्हनावं. मातर तो जयऱ्या माज्या सोधान झाल्यासिवा म्या तुमचे बईल संभाळी घेनार न्हाई.'' (पृ. ९०) इथे तो पोलिसात तक्रार करीत नाही. तो सर्व गावाला त्यांच्या बैलासहित राबवून घेतो. म्हणूनच याचे खलनायकत्व वेगळ्याच स्वरूपाचं बोराडे चित्रित करतात. शोषकांचा प्रतिनिधी म्हणून 'चारापाणी' मध्ये चित्रित झालेली ही व्यक्तिरेखा आहे.

आबाराव शेळके तसा व्यवहारी, हिशेबी, चलाख, व खलनायकाला शोभेल असे त्याचे वर्तन वाटते. एकूणच सरंजामी विचारसरणी अंग बाळगणारा 'सावट' मधील बळवंतरावाप्रमाणे आबाराव शेळकेही त्याचेच प्रतीक वाटतो.

**नारायणराव :**

हे सुखदेवचे वडील खेड्यात राहणारे, शेती व्यवसाय करणारे छोटे शेतकरी. शेती व निसर्ग, शेतीचे काम करणारा शेतकरी व इतर घटकांना जगवणारे बैल यांच्यांसंबंधी दुष्काळात निर्माण झालेल्या 'चारा' व 'पाण्या'च्या प्रश्नाने ते अस्वस्थ होतात. तीन रूपये दराने कडब्याची पेंढी घेऊन ते बैलांना खाऊ घालतात. पण बैलांचं पोट भरत नाही म्हणून इतर शेतकऱ्यांप्रमाणे तेही आपली बैलं आबाराव शेळक्याकडे संभाळी घालण्याचा विचार ते करतात.

नारायणराव 'सावट' मधील आप्पाप्रमाणे ग्रामसंस्कृतीत वाढलेले, नात्यागोत्याचे भावबंध जपणारे आहेत.

उदा. दुष्काळामुळे जिथं स्वतःच्या जनावराच्या चाऱ्याचा प्रश्न नारायणरावासमोर आहे. तिथं जावयाची गुरं आल्याने त्यांची अधिक कोंडी होते. परंतु लेकीचं बरं-वाईट होईल या भीतीने ते ती गुरं परत न पाठवता ठेवून घेतात. तसेच नारायणराव हे स्वाभिमानी आहेत, आपला स्वाभिमान जपताना ते एकाप्रसंगी जेव्हा सुखदेव गावातील शेतकऱ्यांची बैलं तहसीलदारासमोर नेऊन बांधण्याचा विचार करतो. तेव्हा नारायणराव त्याला जावयाची गुरं नेऊ देत नाहीत. 'पाहुणपणाने त्येंच्या संभाळी घातलेली गुरं' बेवारश्यावनी सरकारच्या दारात न्हेऊन उभे केले' (पृ. ९९) असं जावई म्हणेल ही त्यांना भीती वाटते. कारण याचा परिणाम आपल्या लेकीवर होईल याची त्यांना जाणीव आहे. असे हे स्वाभिमानी व नात्यागोत्याचे भावबंध जपणारे नारायणराव होत.

एकूण बोराडे यांच्या कादंबरीतील पुरूष पात्रांचा विचार करता. यातील तरूण पात्रेही

संयमी, वैचारिक बैठक असलेली, नव्या मूल्यांचा स्वीकार करू पाहणारी, प्रसंगी बंडखोर बनणारी, पुरोगामी विचारसरणीची वाटतात.

उदा. दामाजी, प्रकाश, जयवंतराव (सावट), सुखदेव, मल्हारी, बाळबा शेलार, रंगनाथ फावडे, जयराम शिंदे (चारापाणी) तर 'सावट' मधील अंबादासराव (आप्पा), 'चारापाणी'तील नारायणराव, सर्जेराव शिंदे, गोरख पवार, दत्तू घायवट हे दुष्काळपीडित शेतकरी, ग्रामसंस्कृती जपणारे व नात्यागोत्याच्या भावबंधाना जपणारी अशी आहेत. तर बळवंतराव (सावट), आबाराव शेळके (चारापाणी) ही सरंजामीवृत्तीची, बेदरकार, बेरकी आपल्या कृतीउक्तीने गरीब शेतकऱ्यावर व माणसावर वचक बसवणारी खलनायकवृत्तीची पात्रे आहेत. तर सहसीलदार रावळे, गटविकास अधिकारी बावणे, कारखान्याचे अध्यक्ष कोंडोजीराव सातपुते, शेतकरी संघटनेचे तालुका संघटक प्रतापराव कदम या व्यक्ती मदत करणाऱ्या पण त्यांच्या मदतीसही शासकीय पातळीवरून म्हणावी तशी मदत करू शकत नाहीत. अशी ही रा. रं. बोराडे यांच्या कादंबरीतील पुरूष पात्रे आहेत.

यानंतर बोराडे यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यातील स्त्रीपात्रांचा विचार करू. 'सावट' या कादंबरीत दामाजीची आई (माय) व बहीण पमा या स्त्रीव्यक्तिरेखा येतात.

**<u>दामाजीची आई (माय)</u> :**

ही सोशिक, संयमी, सहनशील, स्वाभिमानी व शांत वृत्तीची आणि सांसारिक स्त्री आहे. आईच्या संस्काराचे ओझे घेऊन सासरी नांदायला गेलेल्या पमा - तिच्या संसाराची झालेली परवड दामाजीच्या आईला सहन होत नाही. दामाजीनं पमाच्या सासऱ्याची भाची करावी आणि पमाचा उध्वस्त होणारा संसार सावरावा असं तिला वाटते. ह्या तिच्या वाटण्यातून स्त्रीचं स्त्रीकडे ओढणारं मन प्रकट होते. पमाच्या नांदणुकीबद्दल ती म्हणते, "... मी आखरीचं सांगते तुमाला, तुमी जवर पमाच्या नांदणुकीची सोय करणार न्हाई, तवर मी अन्नपाणी घेणार नाही. पुना सांगितलं न्हाई म्हणताल." (सावट पृ. ४२-४३) तर जयवंताला म्हणते, "जयवंता, नीट इचार कर बाबा, एकुलती एक लेक हाय माजी. उगं काय करता काय होईल." (पृ. ४७) असं लेकीच्या चिंतेनं ग्रासलेलं तिचं मन प्रकट होते.

दामाजीनं पमाच्या सासऱ्याची भाची केली नाही तर तो आपल्या लेकीची जाळभाज करील. अशा चिंतेने ग्रासलेल्या व भावनिक कोंडमारा झालेल्या आईचे चित्रण येथे बोराडे करतात. तिचा जीव दामाजीपेक्षा पमात अधिक गुंतलेला आहे. याठिकाणी निर्माण झालेला

गुंता आप्पानी सोडवावा असं तिला वाटतं परंतु एका प्रसंगी आप्पा तिला समजवतात. त्यावेळी पमाच्या प्रेमापोटी ती म्हणते, "... तुमी बापलेक आतनं मतलेले हाव. तुमी दोगायनी मिळून माज्या लेकराच्या जीनगानीचा खेळ-खंडोबा केलाय' (पृ. ६९) येथे तिची स्त्री म्हणून, आई म्हणून लेकीविषयीची पमाविषयीची आंतरिक तळमळ व्यक्त होते. अशी ही सोशिक, अगतिक व मानसिक, भावनिक कोंडमारा झालेली आई रेखाटलेली आहे.

पमा :

ही 'सावट' कादंबरीतील केंद्रीभूत व्यक्तिरेखा दामाजीची बहीण आहे. तीही आईप्रमाणे सोशिक आहे. त्याचबरोबर नशिबावर हवाला ठेवणारी आहे. आपल्या वाट्याला आलेलं दुःख हा नशिबाचा खेळ आहे असं समजून ते दुःख ती निमूटपणे सोसते. पण पती माणिकरावाचं तिच्यावर असलेले प्रेम हीच तिची जमेची बाजू आहे. सासऱ्याची तिच्यावर फार मोठी जरब आहे. आपल्या लग्नाच्या संदर्भात भाऊ दामाजी तिचं मत विचारतो तेव्हा ती म्हणते, 'मला कायबी सुधरणा झालय. उगं माज्यापायी तुमाला तरास व्हायलाय.' (पृ. ३८) तिच्या या मनाच्या व्यापकपणातून तिची व्यक्तिरेखा ठसठशीत होते.

सोशिक, दैववादी पमाला मामा, जयवंतराव, दामाजी तिला आणायला जातात. तिच्या नवऱ्याने दुसरे लग्न केले म्हणून कोर्टात केस घालण्यासंबंधी विचारतात तेव्हा ती म्हणते, "कुणावर तरी केस करून मला आता काय मिळणार ? येळ आल्यावर कुणीच कुणाचं नसते." (पृ. ८३) हे तिचे बोल हृदयाला पीळ पाडणारे आहेत.

अशाप्रकारे पमा ही पुरूषप्रधान संस्कृतीचा बळी गेलेली स्त्री आहे. परंपरा जोपासणारी, आपल्यावर होणारा अन्याय, अत्याचार निमूटपणे सहन करणारी आणि आपल्यावर होणाऱ्या अन्यायाबद्दल एक शब्दही न बोलणारी अशी आहे. कारण तिची व्यक्तिरेखा ग्रामीण परिस्थितीत व संस्कृतीत घडते त्यामुळे आधुनिक यंत्रयुगातील स्त्रीप्रमाणे ती बंडखोर न दाखवता बोराडे यांनी ग्रामीण संस्कृतीत असलेले स्त्रीचं महात्म्यच जणू या संस्कृतीच्या अंगाने ते व्यक्त करतात.

राहीबाई :

नवरा नारायणराव यांच्याप्रमाणे स्वाभिमानी वृत्ती असलेली ही राहीबाई आहे. पडत्या काळात घराला सावरणारी एक कर्तबगार स्त्री म्हणून तिची व्यक्तिरेखा बोराडे यांनी रेखाटलेली आहे. घरातल्या माणसाप्रमाणेच शेतीवर राबणाऱ्या बैलांवरही तिचा आतोनात जीव आहे.

दावणीचे एकेक जनावर दुष्काळामुळे कमी झाल्याने ती अगतिक होते. आणि आपल्या वाट्याला आलेल्या परिस्थितीला ती दोष देते. म्हणून गरीब परिस्थितीचे ती कुठेही प्रदर्शन करीत नाही. तशी ती स्वभावाने संमजस, शांत आहे. तरी प्रसंगी ती आपल्या मनात साचलेला रागही व्यक्त करते. आबाराव शेळक्याकडे बैल संभाळी घालण्यावरून सुखदेव व त्याच्या बापामध्ये वाद निर्माण होतो. तेव्हा ती नवऱ्यांची बाजू घेऊन सुखदेवला रागाने बोलते, 'सुखदेवा, तू आल्याआल्याचं ह्या काय कटकटी सुरू केल्या रं बाबा ?' (पृ. २८) पण यातही तिचे घराचे घरपण जपण्याची तळमळ दिसते. सुखदेवप्रमाणे मुलगी शकूचीही तिला काळजी आहे. जावयाची सांभाळाय आलेली जनावरं परत पाठविली तर जावई तो राग शकूवर काढील ही तिला भीती आहे. म्हणून ती म्हणते, ''दोन येळा जेवायचं ते एका येळला जेऊ. उपासी तापाशी ऱ्हाऊ पर पावसाळ्यापसवर त्यांची जनावर सांभाळू' (पृ. ५५) यातून तिच्या ओढाताणीचे व मानसिक कोंडमाऱ्याचा प्रत्यय येतो.

अशीही ही सोशिक, संयमी, सहनशील, शांत स्वभावाची राहीबाई आहे. 'सावट' मधील दामाजीची माय ही अशीच आहे. या कादंबऱ्यांतील स्त्रीपात्राविषयी या. वा. वाडस्कर लिहितात, ''बोराड्यांच्या कथामधील स्त्री असो, तरूण पत्नी असो, वृद्ध आई असो, प्रौढ भगिनी असो, की सासू असो, अंतिमतः ती जीवनाचे सातत्य सांभाळणाऱ्या धरित्रीची भूमिका पार पाडत असते.''[७] अशी बोराडेंची स्त्री-पात्रे सोशिक, सहनशील आहेत. तर इंद्रजित भालेराव म्हणतात, ''प्रत्येक पात्र ठाशीव आणि रेखीव निर्माण करणं आणि लकबीसह त्यांचं व्यक्तिमत्त्व निर्माण करणं हेही बोराडेंच्या लेखनाचं खास वैशिष्ट्य आहे.''[८]

अशाप्रकारे बोराडे यांच्या 'सावट' व 'चारापाणी' या कादंबऱ्यातील स्त्रिया या ग्रामीण संस्कृतीचे संस्कार जोपासत, आपल्या ओढग्रस्त संसाराला सावरणाऱ्या, आपल्या वाट्याला आलेले दुःख, होणारे अन्याय, अत्याचार निमूटपणे सहन करणाऱ्या, तसेच पुरूषप्रधान संस्कृतीच्या जरबेखाली त्यांचा होणारा भावनिक, मानसिक कोंडमारा यामुळे अगतिक झालेली स्त्रीपात्रे दिसून येतात. एकूणच संयमी, सोशिक, सहनशील, संसाराला सावरण्यासाठी काबाडकष्ट करणारी व नात्यागोत्याच्या भावबंधाची जपणूक करणारी स्त्रीपात्रे प्रामुख्याने बोराडे यांनी या कादंबऱ्यातून रेखाटलेली आहेत.

इतर पात्रांचा विचार करता प्रकाश हा नव्या विचारांचा पुरस्कार करणार, बंडखोर असा दामाजीचा मित्र, याचस्वरूपाचे जयवंतराव, तर पमावर प्रेम करणारा, नव्या बायकोला

जवळ न करणारा, परंपरा जपणारा, बापाच्या हातचं बाहुलं असलेला माणिकराव, आणि आप्पाजींच्या कुटुंबाबद्दल सहानुभूती असणारा व त्यांच्या सुखदुःखात सहभागी होणारा संपत ह्या व्यक्तिरेखा 'सावट' मध्ये लेखकाने चित्रित केलेल्या दिसून येतात.

**संघर्षाचे चित्रण :**

'संघर्ष' हा ललित साहित्याचा आत्मा असतो. रा. रं. बोराडे यांनी 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यामध्ये जे संघर्षाचे चित्रण येते; त्याचे स्वरूप प्रामुख्याने कौटुंबिक ताणतणावाचे व दुष्काळासारख्या परिस्थितीमुळे किंवा ग्रामीण भागातील नात्यागोत्याच्या पेचामुळे निर्माण झाला. या संघर्षाचे स्वरूप जसे काहीवेळा वैयक्तिक पातळीवर असते तसेच ते सामूहिक पातळीवरचेही असते. आणखी या संघर्षाचे वैशिष्ट्य म्हणजे या कादंबरीतील संघर्ष जसा बाह्य-स्वरूपाचा आहे तसा अंतर्गत स्वरूपाचाही असलेला दिसून येतो.

'सावट' या कादंबरीतही कौटुंबिक ताणतणावाचे प्रसंग बोराडे चित्रित करतात. आप्पा आणि माय यांच्यात हे तणावपूर्ण प्रसंग अनेकदा निर्माण होतात. आप्पांनी नकार कळविल्यानं पमाचा सासरा चिडून तिला माहेरी पाठवितो. माय दामाजीशी अजिबात बोलत नाही, ''मला काय सांगा म्हणताव, तुमी दोगंबी बापलेक श्याने-सुरते हाव. तुमी दोगं करा इचार.'' पुढे म्हणते, ''म्हागंच्या खेपला दामाजी आलता तवा काय केलताव तर पमाच्या मामाला सांगावा करतो, त्याला घिऊन पमाकडं जातो. पावन्याला समदं समजावून सांगतो. सांधा बगून पमाचा इचार घेतो. आसं दामाजीदेखत बोलला व्हताव. याद नसंल तर पुसा तुमच्या लेकाला.'' संपत वाद मिटवायचा प्रयत्न करतो तेव्हा म्हणते, ''ह्येचं आसंच हाय बाबा. लेकाला शिकवायच्या येडानं ह्येनला लई झपाटलंय, एव्हडं शिकून उद्या काय दिवे लावतो कुनाला ठाव ?'' (पृ. ३६-३७) मायप्रमाणे मामाही दामाजी आणि आप्पांना टोचून बोलतात. दामाजीही अस्वस्थ होतो.

पमाला सवत आणली जाते तेव्हा अशाच एका प्रसंगी आप्पा दामाजीची बाजू सावरून घेतात. तेव्हाही माय आप्पांना म्हणते, ''घ्या की लेकाचा कैवार. नरडीला आनून ठिवलं तरी आजून लेकाचा कैवार घ्यायची सवं जात न्हाई.'' नंतर डोळ्यातून अश्रू ढाळते म्हणते, ''... तरी म्या तवाच तुमाला म्हनलं व्हतं, हितकं ह्येला शिकवू नका म्हनून सांगितलं व्हतं. शिकल्यानं मानसं लई ल्हाचार व्हतेत; मला ठावं व्हतं'' (पृ. ६९) असे कौटुंबिक ताणतणावाचे प्रसंग कादंबरीमध्ये रा. रं. बोराडे चित्रित करतात. हे प्रसंग अगदी जिवंत वाटतात.

सामाजिक संघर्षाचे प्रसंगही अनेक ठिकाणी येतात. 'चारापाणी' कादंबरीमध्ये सुखदेवचे आबाराव शेळके याच्याशी, शासनाच्या अधिकाऱ्यांशी, साखर कारखान्याच्या चेअरमनशी निर्माण झालेले संघर्षाचे प्रसंग रा. रं. बोराडे चित्रित करतात. 'सावट' मध्ये पमाचा सासरा आणि दामाजी, पमाचा सासरा आणि जयवंतराव, प्रकाश व पमाचा गाववाला यशवंता यांच्यातील ताणतणावांचे प्रसंग कादंबरीतून चित्रित होतात.

'सावट' मधील संघर्षाविषयी भीमराव वाघौरे म्हणतात, ''येथील संघर्षाचे स्वरूप कौटुंबिक असले तरी या संघर्षाचा रोख सामाजिक मूल्यव्यवस्थेशी आहे. ही समाजव्यवस्था आजही पुरूषप्रधान संस्कृतीची पारंपारिक मूल्ये जपणारी आहे. याच समाजव्यवस्थेने स्त्रीला अत्यंत गौण स्थान दिलेले आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी तिचा 'हत्यार' म्हणून उपयोग करून अखेर तिला दूर भिरकावलेलं आहे.''[९] हे भीमराव वाघचौरे यांचे विवेचन योग्य असेच आहे. 'सावट' कादंबरीत अशा प्रकारचं ताणतणावांचं वातावरण शेवटपर्यंत राहतं.

'चारापाणी' मध्ये जनावरांच्या चाऱ्याचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हाताळताना, त्या अनुषंगाने परस्परविरोधी ताणतणावांचेही चित्रण बोराडे करतात. कादंबरीच्या सुरवातीलाच सुखदेव आणि त्याच्या वडिलामधील संघर्ष निर्माण होतो. हा संघर्ष सुखदेव आणि आबाराव शेळके यांच्या अनुषंगाने निर्माण होतो. नंतर या संघर्षाचे स्वरूप बदलत जाऊन सुखदेव, गावकरी आणि आबाराव शेळके व यानंतर सुखदेव, गावकरी आणि शासन असे या संघर्षाचे स्वरूप वाढत जाते. असा हा तिहेरी स्वरूपाचा संघर्ष रा. रं. बोराडे या कादंबरीत चित्रित करतात.

परंतु हा संघर्ष अंतिम स्वरूपाचा संघर्ष ठरत नाही. आबाराव शेळक्याकडे आपले बैल सांभाळी घालू दिले असते. तर सुखदेव आणि नारायणराव यांच्यात संघर्ष निर्माण झाला नसता काय ? किंवा बी. डी. ओ. ने आणि साखर कारखान्याच्या चेअरमनने गुरांच्या छावण्या सुरू केल्या असत्या तर, सर्व प्रश्न कायमचे सुटले असते काय ? परंतु तसे होत नाही कारण मानवी जीवनात असंख्य गरजा व असंख्य प्रश्न आहेत. येथे काही प्रश्नावरच प्रकाशझोत टाकला जातो.

येथील तात्कालिक स्वरूपाचा संघर्ष हा आबाराव शेळके या खलनायकाच्या स्वरूपात वावरताना दिसतो. परंतु खरा संघर्ष शेळके विरूद्ध गावकरी किवा गावकरी विरूद्ध शासन एवढ्याच पातळीवर तो राहत नाही तर निसर्ग विरूद्ध माणूस असेही त्याला स्वरूप प्राप्त होताना दिसते.

त्याचबरोबर 'चारापाणी' मधला संघर्ष दोन पातळ्यावरचा वाटतो. एक म्हणजे वैयक्तिक पातळीवरचा व दुसरा म्हणजे सामूहिक पातळीवरचा सुरूवातीला सुखदेव विरूद्ध वडील असा कौटुंबिक संघर्ष निर्माण होतो. दुष्काळी परिस्थितीचा फायदा घेणाऱ्या आबाराव शेळकेशी संघर्ष सुरू होतो. त्यामुळे सुखदेवचे वडील नारायणराव म्हणतात, "म्हंजी आता तर समदीच पंचाईत करून ठिवलीस. उद्या मला आबाराव शेळक्याकडं जायचं झालं तर कोंच्या तोंडानं जाऊ ?... आपले बैल संभाळी घ्या म्हणून म्या कोंच्या तोंडानं सांगू ?" (चारापाणी, पृ. २७) सुखदेव चारापाण्याची सोय करण्याची वडिलांना खात्री देतो. वेळ आलीच तर स्वतः आडवं पडेन असा आवेशाने म्हणतो. एवढ्याचपायी शिकवलं असं वडील म्हणतात तेव्हा म्हणतो, "काय शिकविलं तुम्ही मला ?... मॅट्रिक पर्यंत कसंबसं शिकवलं, पुढचं सारं शिक्षण मी माझ्या हिंमतीवर करतोय. कधी रेडिओ केंद्रात काम करतोय तर कधी कुण्या वर्तमान पत्रातल्या कचेरीत काम करतोय. माझ्या कॉलेजशिक्षणासाठी तुम्ही मला एक दिडका तरी दिलाय का?" तात्या (वडील) विषादानं म्हणतात, "आरं एवढा आकडीचा व्हतास तर कस्याला जिरायत शेतकऱ्याच्या पोटाला जन्माला आलास?... एकांद्या बागायतदाराच्या पोटाला जन्माला का गेला न्हाईस ?" (चारापाणी पृ. २८) असे कौटुंबिक ताणतणावांचे चित्रण बोराडे करतात. गावकऱ्यांना पाठीशी घालून आबाराव शेळकेविरूद्ध केलेला संघर्ष यातही सुखदेव एकटाच पडतो. असा एकाकी पडलेल्या सुखदेवचा संघर्ष वैयक्तिक पातळीवरचा वाटतो. तर सर्जेराव शिंदे व जयराम या पितापुत्राच्या ताणतणावातून एका अंतर्गत संघर्षाची प्रचिती येत. सर्जेराव शिंदे याने सर्व गावकऱ्यांप्रमाणे आपले बैल आबारावाकडे संभाळी व शेतही त्याच्याकडेच लावलेलं असतं. या गोष्टीस मुलगा जयरामचा विरोध असतो शिवाय सर्जेराव आबारावचे रोजगारी म्हणून काम करीत असतो. आबारावचे औत शेतात आल्यावर जयराम आडवा पडतो.

"म्या हे शेत आबाराव शेळक्याला लावलंय"

"आबाराव शेळक्याला शेत लावायचा तुमाला एकल्याला अधिकार न्हाई"

"सोताची कमाई असल्यावानीच बोलतोस की रं ?"

"तुमची तरी कुठं कमाई हाय. आपल्या बापजाद्यांची कमाई हाय" (चारापाणी, पृ. ७६-७७).

असे जयरामने म्हणताच सर्जेराव शिंदे जयरामला मारायला धावतो. तो तरीही ऐकत नाही तेव्हा सर्जेरावच्या सांगण्यानुसार त्यास झाडाला बांधून घालून औत शेतात घातला

जातो. म्हणून चिडलेला जयराम आबाराव शेळकेची कडब्याची गंजी पेटवितो आणि हा तणाव अधिकच वाढत राहतो. हा संघर्ष वाचकाच्या डोळ्यासमोर जसाच्या तसा उभा करण्याचं कसब रा. रं. बोराडे यांना साधलेलं आहे.

सर्जेराव शिंदे आबारावाच्या आहारी गेलेला असतो, त्यामुळे त्याची वैचारिक ताकद लक्षात येते. तर जयराम हा नव्या व प्रक्षोभक विचारांचा सुखदेवचा प्रतिनिधी ठरतो. अशाप्रकारे कौटुंबिक ताणतणाव, गावपातळीवरील ताणतणाव व शासकीय पातळीवरील संघर्षरूपाची मूळ प्रश्नांच्या समस्यांच्या अनुषंगाने निर्मिती केलेली दिसते.

**प्रसंगचित्रण :**

रा. रं. बोराडे यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यातील पात्रचित्रणानंतर, संघर्षचित्रणानंतर प्रसंगाचित्रणाचा विचार करू. काही एक मर्यादेपर्यंत रा. रं. बोराडे घटनाप्रसंग वाचकांच्या डोळ्यासमोर जसाच्या तसा उभा करण्याचा प्रयत्न करतात.

'सावट' या कादंबरीत काही घटनाप्रसंगांचे चित्रण येते. ते प्रामुख्याने ग्रामीण जीवनानुभवाचे प्रत्यंतर देण्यासाठीच. म्हणून बोराडे येथे ग्रामीण जीवनानुभव व त्यातील वास्तव प्रकट करण्यासाठी काही घटनाप्रसंगाचे चित्रण करतात. ग्रामीण जीवनातील व्यथा-वेदनांची 'जडशीळ पडशी' खांद्यावर वागवणारे आणि करकचून बांधल्यागत बसलेले आप्पा, 'परमुलखात लेकरू शिकतंय', म्हणून पिशवीत दशम्यांचं गाठोडं, शेंगदाण्याची चटणी, आंब्याच्या लोणच्याच्या फोडी देणारी आणि ''तुमी बापलेक कायबी करा, पर माज्या लेकराला वनवासी करू नका'' (पृ. २२-२३) अशी केविलवाणी अगतिक होऊन विनवणी करणारी आई, स्वतःचं संपूर्ण आयुष्य उकिरड्यावर फेकलं जाणार असल्याची कल्पना असूनही गरीब गाईसारखी गुरांच्या गोठ्यातील गाईप्रमाणे राहणारी पमा, पती म्हणून अस्तित्त्वहीन झालेला आणि बेदरकार बापाच्या हातचं बाहुलं बनून राहणारा पमाचा नवरा माणिकराव आणि सर्वांच्यावर वचक बसविणारा, सरंजामी वृत्तीचा आडदांड पमाचा सासरा बळवंतराव या सर्व व्यक्तिरेखा ग्रामसंस्कृतीशी बांधल्या गेलेल्या दिसतात. त्यांचं हे ग्रामसंस्कृतीशी बांधलं जाणं रा. रं. बोराडे अनेक प्रसंगातून चित्रित करतात. 'सावट' मध्ये नात्यागोत्यातील पेच हाच कथानकाचा केंद्रबिंदू असल्याने येथे शेती, झाडे, निसर्ग ह्यांचे फारसे वर्णन येत नाही. तरीही बोराडे आवश्यक योग्य अशी चित्रणं करून ग्रामीणत्वाचा प्रत्यय या कादंबरीतील प्रसंगांतून देतात. उदा. गावाच्या एकोप्याचं प्रसंगचित्रण, 'दामाजी पमाच्या सासऱ्याची भाची स्वीकारत नसल्याचे आणि पमाला

नांदवलं जाणार नसल्याचं त्याच्या आईने मनाला लावून घेतल्याची वार्ता गावभर पसरते. ''घरातल्या या प्रकारची वार्ता गावभर पसरली. मायला बघण्यासाठी माणसांची रीघ लागली पुरूष माणसं डहाळजत आप्पा जवळ टेकू लागत. काय झालं कसं झालं, यासंबंधी विचारणा करू लागत.'' (सावट पृ. ४३) यातून गावाचा आणि त्यांच्या कुटुंबातील ऋणानुबंधाचा प्रत्यय येतो.

'सावट' मध्ये पमाच्या काळजीमुळे माय आणि आप्पा यांच्यात निर्माण झालेले ताणतणावपूर्ण प्रसंग, तसेच पमाला माहेरी पाठविल्याचा प्रसंग, नंतर पमाला सवत आणल्याचा प्रसंग बोराडे अतिशय जिवंत असे चित्रित करतात. 'चारापाणी' या कादंबरीतही काही बोलके प्रसंग येतात.

उदा. चाऱ्या अभावी गावातील सर्व शेतकऱ्यांचे बैल तहसीलसमोर न्यायचे असतात, त्यावेळी त्यांच्या कपाळावर लावलेल्या पाट्यांना कमालीची वैचारिक कलात्मकता लाभते. 'आम्हाला खाऊ नका, आम्हाला खायला द्या.' 'आम्ही जगलो तरच शेतकरी जगेल.' या पाट्या लेखकाच्या आकलनशक्तीचा प्रत्यय देतात. तसेच पशुहत्याबंदीवरही प्रकाशझोत टाकतात. पण येथे कलात्मकते व्यतिरिक्त प्राण्यावरील प्रेम प्रभावीपणे प्रकट होत नाही.

वास्तविक 'चारापाणी' या कादंबरीत 'दुष्काळ' या नैसर्गिक, सामुदायिक संकटाचा व्याप अतिशय प्रचंड व बहुअंगी असतो. परंतु तिच्या अव्याप्त भीषणतेची तिच्यातून अनुभूती येत नाही. १९८५ च्या दुष्काळाचे अत्यंत मर्यादित केवळ एका गावापुरतेच असे चित्रण येते अन् तेही वरवरचे व रिपोर्टवजा येते म्हणून येथील दुष्काळ, पाणीटंचाई, चाराटंचाई लक्षात येते. परंतु येथील तीव्रता, भीषणता, दाहकता वाचकाचे अंतःकरण हेलावून सोडणारी दिसून येत नाही म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की, 'चारापाणी' मधील काही प्रसंग बोलके असले तरी ते कादंबरीच्या आशय द्रव्याला परिपक्वता देणारे वाटत नाहीत.

'चारापाणी' या कादंबरीतील घटना व प्रसंगचित्रणाचा विचार करता कादंबरीच्या आशय अभिव्यक्तीशी समरस न होणारे अनेक प्रसंग येतात. कथानकाची लांबी वाढविण्यास फक्त मदत होते. पण ते घटनाप्रसंग कादंबरीच्या कलात्मक मूल्यात भर घालीत नाहीत.

उदा. कुठल्यातरी तांड्यावरच्या बाईचं पाण्याविना मेलेलं मूल'

हा प्रसंग - एका रात्री रामा सुराशेच्या बायकोला ग्लासभर पाणी हवं असतं म्हणून ती विहिरीवर जाते व विहिरीत पडते. हा प्रसंग फक्त सांगितला जातो परंतु पाण्याची तीव्रता मात्र

बोराडे चित्रित करीत नाहीत. मात्र येवेळी सुखदेवला एका तांड्यावर बाळंत झालेल्या बाईच्या संदर्भात हा प्रसंग आठवतो. ही बाई बाळंत झाल्यावर तिच्या जन्मलेल्या अर्भकाचं नैसर्गिक आवरण धुण्यासाठी पाणी मिळत नाही म्हणून ते अर्भक मरतं. परंतु वास्तवाचे काय ? वास्तवात अनेकदा असंही घडते की स्त्रिया रानात बाळंत होतात आणि मुलाच्या अंगावरचं नैसर्गिक आवरण नुसत्या लुगड्याने पुसून मूल घरी घेऊन येतात. त्यामुळे हा प्रसंग रिपोर्टवजाच वाटतो.

आणखी एक प्रसंग म्हणजे नारायणरावाकडे सांभाळायला म्हणून येणारी जावयाची गुरं होय. गावात चाऱ्याची आणि पाण्याची टंचाई निर्माण झालेली असतानाही जावयाची गुरं सांभाळायला येतात. ही गुरं सांभाळावी तर त्यांना खायला काय घालावं ? आणि परत पाठवावी तर जावई आपल्या लेकीची जाळभाज करील असा पेच या कुटुंबात निर्माण होतो. त्याचबरोबर पाणी अडविले पाहिजे, ते जिरविले पाहिजे, वृक्षतोड थांबवली पाहिजे. पर्यावरणाला हातभार लावला पाहिजे अशी येणारी प्रसंगोपात भाष्ये ही कादंबरीच्या आशयद्रव्याशी एकरूप न होणारी वाटतात.

अशाप्रकारे 'सावट' मधील प्रसंगचित्रणे ही ग्रामीणत्वाची प्रचिती देणारी व नात्यागोत्याचा पेच निर्माण झाल्यामुळे कौटुंबिक ताणतणावाचे चित्रण करणारी आहेत. त्यामुळे येथील प्रसंगचित्रण कादंबरीच्या आशयाभिव्यक्तीशी एकरूप होणारे वाटतात. मात्र 'चारापाणी' मधील प्रसंगचित्रण या स्वरूपाचे नाही त्यांचे स्वरूप वृत्तपत्रातील रिपोर्टसारखे वाटते. फक्त घटनाप्रसंगांची या कादंबरीतील साखळी ही तर्काच्या अनुषंगाने सुसंगत अशीच वाटते.

**निसर्गचित्रण :**

रा. रं. बोराडे यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांमध्ये काही प्रमाणात निसर्गचित्रणही आले आहे. 'चारापाणी' मध्ये "कुठंतरी एखादं झाड, झाडाच्या आसऱ्यानं उभी असावीत तशी झुडपं." (चारापाणी पृ. १) हे निसर्गाचे दुष्काळातील चित्रण येते. नंतर एके ठिकाणी, "उघडीवाघडी वाट. एकटी एकटी वाटणारी, कुणाचाही आधार नसल्यावनी दिसणारी, वाटंवर कुठंतरी एखादं झुडूप केविलवाणं दिसणारं." यावेळी सुखदेवला लहानपणीचा नदीकाठ आठवतो. "पूर्वी नदीच्या काठानं चालायचं म्हणजे किती मजा वाटायची. पायघड्या घालावं तसं हिरवं लुसलुशीत गवत पायाखाली पसरलेलं असायचं. नात्यागोत्यातील माणसं भेटावी तशी नदीकाठची झाडं दिसायची. (चारापाणी, पृ. २५) हे चित्रण येते. कारण पूर्वी पाऊस भरपूर असल्याने निसर्ग हिरवागार वाटे.

अलिकडे पावसाचे प्रमाण खूप कमी झाले आहे. त्यामुळं सतत दुष्काळ पडतो. जमिनीतलं पाणी खेचण्यासाठी माणसांची स्पर्धा सुरू होते. परिणामी जमिनीच्या पोटातील पाण्याची पातळी कमी होताना दिसते. ते चित्रण, ''गाव जवळ येऊ लागलं अन् नदीच्या पात्रात खड्डे दिसू लागले. गावकऱ्यांनी पाण्याचा तपास घेण्यासाठी खोदलेले. गाव जसजसं जवळ येत चाललं तस तशी खड्ड्यांची संख्या वाढत चालली. जिकडं नजर टाकावी तिकडं नुसतेच खड्डे.'' (चारापाणी, पृ. २६)

'सावट' मध्ये निसर्गचित्रण खूपच कमी प्रमाणात आले आहे. उदा. ''... मी अंगणातल्या बाजेवर पडलो. आकाशातल्या चांदण्याकडं उगीचच बघत राहिला. मन विलक्षण उदास झालं होतं.'' (सावट, पृ. २५) असं एखादं निसर्गचित्रण येते. रा. रं. बोराडे 'सावट' मध्ये निसर्गचित्रणापेक्षा माणसाच्या मानसिकतेचे चित्रण करण्यावर अधिक भर देतात. अंतर्गत ताणतणावांचे चित्रण त्यांनी 'सावट' मध्ये अधिक प्रमाणावर केले आहे. शेती, शेतकरी यांचे संदर्भही अधिक प्रमाणात येत नाहीत. कारण येथे भर दिला आहे तो नात्यागोत्यातील मानसिक ताणतणावावरच.

**'सावट' व 'चारापाणी' मधील निवेदन पद्धती :**

कादंबरीतील प्रसंगचित्रण, पात्रचित्रण त्या पात्रांचे स्वभाव वृत्तीप्रवृत्ती इ. बाबींना जे महत्त्व प्राप्त होते ते निवेदनामुळेच, प्रथमपुरूषी किंवा आत्मनिवेदन, तृतीय पुरूषी निवेदन असे निवेदनाचे प्रकार पडतात.

प्रथमपुरूषी किंवा आत्मनिवेदन या पद्धतीमध्ये कादंबरीतील पात्राने - विशेषतः नायक-नायिका अथवा एखाद्या मध्यवर्ती पात्राने स्वतःच आपली कथा-व्यथा सांगणे, या पद्धतीमुळे भावानुभूतीची जितक्या तीव्रतेने जाणीव होते तितक्या तीव्रतेने तृतीयपुरूषी निवेदनातून होत नाही.

'सावट' या कादंबरीसाठी प्रथमपुरूषी आत्मनिवेदन पद्धती स्वीकारलेली दिसून येते. येथे आत्मनिवेदक स्वतःच्याच दृष्टीतून येथील समाज व संपूर्ण मानवी जीवनाकडे सर्वांगीण दृष्टीने पाहत असतो. हे आत्मनिवेदकाचे पाहणे याचाच अर्थ लेखकाच्या अनुभूतीचे प्रकटीकरण करू शकते.

'सावट' मधील प्रथमपुरूषी निवेदनामुळे ग्रामीण जीवनातील संस्कृतीतील, नात्यागोत्यामध्ये गुरफटलेल्या, माणसांचा मानसिक, भावनिक कोंडमारा अत्यंत उत्कटतेने

प्रत्ययास येतो. 'सावट' मधील दामाजीच्या कोंडलेल्या, दबलेल्या मनाचे हुंकार प्रभावीपणे प्रगट होताना दिसतात. दामाजी या नायकाचे भावविश्व या पद्धतीमुळेच त्याला अधिक प्रगट करता आलेले दिसून येते. यातूनच दामाजीचे भावविश्व आणि त्याच्या कुटुंबियांचे भावविश्व, त्यातील व्यथावेदनांचे सावट अधिक गहिरे होत गेलेले दिसते.

'चारापाणी' ही कादंबरी तृतीयपुरूषी निवेदनातून साकारलेली दिसून येते. ह्या स्वरूपाचे निवेदन नेहमी तटस्थ असते. त्यामुळे कादंबरीतील अनुभूतीच्या प्रकटीकरणाला मर्यादा पडतात. आणि तसेच भावानुभूती हव्या तेवढ्या प्रमणात उत्कटतेचा प्रत्यय ह्या पद्धतीमुळे मिळू शकत नाही. वास्तविक या निवेदन पद्धतीमुळे कादंबरीचे कथानक व वातावरण निर्मिती इ. बाबींना साकारऱ्यात समर्थनीय ठरेल असे नाही. याउलट या दोन्ही कादंबऱ्यातील कथात्म स्वरूपाची अभिव्यक्ती तृतीय पुरूषी निवेदनपद्धतीमुळे प्रत्ययकारी ठरलेली दिसते. 'चारापाणी' या कादंबरीतील जनावरांच्या चारापाण्याची समस्या व अन्य प्रश्न अधिक प्रत्ययकारी झालले दिसून येतात.

**भाषाशैली :**

'सावट' आणि 'चारापाणी' या रा. रं. बोराडे यांच्या कादंबऱ्यांच्या भाषाशैलीचा विचार इथे करावयाचा आहे. कादंबरीमध्ये भाषाशैलीला महत्त्वपूर्ण असे स्थान असते. लेखनाच्या शैलीवून लेखक ओळखला जातो. भाषाशैलीद्वारे पात्रचित्रण, प्रसंगचित्रण यांना आकर्षकपणा येत असतो. सामाजिक व्यवहाराचे माध्यम म्हणून भाषा जशी महत्त्वाची आहे तसेच साहित्यामध्येही भाषेला महत्त्वपूर्ण स्थान असते. भाषेच्या माध्यमातून साहित्याचे लेखन होत असते. म्हणून भाषेला कादंबरीमध्येही महत्त्वाचे स्थान असलेले दिसते. यामध्ये निवेदनाची भाषा, संवादाची भाषा तसेच भाषेचे अन्य विशेष असे विभाजन करता येईल.

'चारापाणी' या कादंबरीचं निवेदन ग्रामीण-नागर असे मिश्र स्वरूपात आहे. उदा. "उन्हाळ्याचे दिवस, सकाळची दहा-अकरा वाजण्याची वेळ उन्हाचा जाणवण्याइतपत चटका." (चारापाणी, पृ. १) "उघडीवाघडी वाट, एकटी एकटी वाटणारी, कुणाचाही आधार नसल्यावनी दिसणारी." (चारापाणी, पृ. २५) "बैलगाडीत त्याची बायको होती, उदासल्यावनी बसलेली, तिच्या मांडीवर मूल होतं. बहुधा ते झोपलं असावं." (चारापाणी, पृ. २) "एरव्ही हीच माणसं, याच रस्त्यानं चालताना किती झोकात चालत किती मोकळं-चाकळं बोलत." (चारापाणी, पृ. ३) तर 'सावट' या कादंबरीमध्येही ग्रामीण-नागर असे संमिश्र निवेदन बोराडे

करतात. दामाजी हा नायक कॉलेज शिक्षण घेणारा आहे तरीही त्याची भाषा ग्रामीणतेचे संस्कार झालेली दिसते. उदा. ''ते काळजीत अगदी काळवडून गेल्यावनी दिसत होते.'' (सावट, पृ. ६)

''मायलाही आप्पांचं बोलणं पटल्यावनी दिसलं'' (सावट, पृ. २१)

''आप्पा ताटातलं अन्न चिवडल्यावनी करू लागले'' (सावट, पृ. ३६)

''माणिकराव हिरमोड झाल्यावनी बसून राहिले'' (सावट, पृ. ५८)

''मला घाबरं सुटल्यावनी झालं'' (सावट, पृ. ६०)

अशाप्रकारे निवेदनाची भाषा साधी, सरळ आहे.

**निवेदनात छोटी-छोटी वाक्ये :**

निवेदनात लहान लहान वाक्ये येतात. त्यामुळे निवेदनात नेमकेपणा येतो तसेच परिणामकारकताही वाढते.

उदा. ''राहीबाईनं बाज आणली. सुखदेवने कपडे काढले. तो बाजेच्या खोलगट भागात बसला. राहीबाईनं त्यास पाणी दिलं.'' (चारापाणी, पृ. ५)

''सुखदेवनं गाडीवाट सोडली, रस्ता बदलला. आणि तो नदीकाठच्य पाऊलवाटेने चालू लागला.'' (चारापाणी, पृ. २५)

''सर्वजण आवेश संचारल्यावनी उठले. आपल्या घराकडे चालू लागले. सुखदेव समाधानानं स्वतःशीच हसला.'' (चारापाणी, पृ. ९८)

तर 'सावट' मध्ये, ''आता पुरतं अंधारलं होतं, रस्त्यावरचे दिवे झगमगत होते. मी नुकताच माझा स्वयंपाक केला होता.'' (सावट, पृ. १)

''रात्रीचे नऊ वाजले होते. मी नुकतंच जेवण केलं होतं. अभ्यासाला बसण्याच्या मी विचारात होतो.'' (सावट, पृ. ५६)

**संवादाची भाषा :**

'सावट' आणि 'चारापाणी' या रा. रं. बोराडे यांच्या कादंबऱ्यातील संवादाची भाषा ही खूप अर्थपूर्ण वाटते. कथानकाची रंगत वाढविण्यात संवादातील नेमकेपणाची मदत होते. संवादामुळे कथानकही विकसीत होते. पात्रांचे स्वभावदर्शन होण्यासही संवादाची मदत होते. मीताक्षरी संवाद हे बोराडे यांच्या भाषाशैलीचं वैशिष्ट्य सांगता येते.

उदा. 'चारापाणी' मध्ये दत्तू घायवट आणि सुखदेव यांच्यातील संवाद :-

"कुठं निघालात ?"

"पोट न्हील तिकडं"

"म्हणजे ?"

"जनावरांना चारा नाही. मानसाला प्यायला पाणी न्हाई. गावात ऱ्हायचं कसं ?"

"कुठं जाणार तुम्ही ?"

"जितं चारापाणी मिळंल तिथं जाऊ" (चारापाणी, पृ. २)

**नारायणराव व सुखदेव यांच्यातील संवाद :**

"सुखदेव, म्या एक ठरविलंय."

"काय ?"

"आपल्या दावणीचे बैल इकून टाकायचे."

"का ?"

"घरात पिंढीभर कडबा न्हाई, इकत घीन म्हटलं तर तेवढी आपली आयपतच न्हाई."

"म्हणजे तुम्ही आपला औत मोडणार ?"

"तेच्यासिवा आता दुसरा इलाजच न्हाई न्हवं का ?" (चारापाणी, पृ. ९)

**'सावट' मधील दामाजी आणि पमाचा सासरा यांच्यातील संवाद :**

"ह्या आठ-पंधरा दिसात तुमचे वडील हिकडं आलते का हो ?"

"हो... आलते"

"मंग, तुमच्या लग्नाचा इशय निगाला आसंलच की"

"हो, निघाला होता"

"मंग तुमचं काय ठरलं ?"

"मला आताच लग्न करायचं नाही"

"का ?"

"मी आताशी बी.एस्सीच्या पहिल्या वर्षाला आहे. माझं अद्याप बरंच शिक्षण व्हायचंय"

"लग्न झाल्यानंतर तुमला जे व्हायचं आसंल ते खुशाल व्हा की. आमची त्येला ना न्हाई."

"लग्न झाल्यानंतर शिक्षण होत नसतं"

"करायचं म्हणल्यावर समदं व्हतं ओ. फक्त करायचं मनात पायजी" (सावट पृ. १५)

**आप्पा – दामाजी मधील संवाद :**

"आता अजून किती दिवस हितं ऱ्हानार हायीस ?"

"मला कुठं जा म्हणता ?"

"शिकायला जात ऱ्हाईस का ?"

"नाही... मला आता शिकायचं नाही"

"का ?"

"मला आता शिकावं वाटत नाही"

"आरं, आसं कसं करायलास रं. ? त्या पोरीचं वाटोळं केलंस आता निदान तुजं तरी धड करून घे. म्हातारपनी आमाला नीट तुकडा मोडू दे" (सावट, पृ. ८६)

असे संवाद खूप बोलके वाटतात. हे संवाद मिताक्षरी असल्यामुळेही घटनाप्रसंग जसाच्या तसा डोळ्यासमोर उभा राहतो. त्यांना अर्थपूर्णता लाभते. हे संवाद ग्रामीण भाषेतून चित्रित केलेले आहे. संवादातून पात्राची मनोव्यथाही भावविवशतेने व्यक्त होते.

बोराडे यांच्या कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवनातील अनेक शब्द विखुरलेले आहेत. ही भाषा नागरभाषा आणि बोलीभाषा यांच्यातील दुवा म्हणून येते. 'सावट' आणि 'चारापाणी' मधील अन्य भाषाविशेष पाहता येतील.

**अन्य भाषाविशेष :**

**निवेदनात सादशब्दांचा वापर :**

'सावट' आणि 'चारापाणी' तून मराठवाड्यातील ग्रामीण जीवनाचे चित्रण रा. रं. बोराडे करतात. तेथील काही शब्द लकब म्हणून येतात.

उदा. 'फाटका-तुटका, उघड्या-वाघड्या, उरलं-सुरलं, मोकळं-चाकळं, घासून-पुसून, उसना-पासना, झाक-पाक, तडका-फडकी, सांडायला-लवंडायला, फाटक्या-विटक्या, किडूक-मिडूक, ओंजारीत-गोंजारीत, गुरं-ढोरं, निम्मा-शिम्मा इ. (चारापाणी), सांगावा-बिंगावा, कावरा-बावरा, धोका-बिका, वाकडं-तिकडं, मोजकं-तुटकं, उठल्या-बसल्या, श्याने-सुरते, लेचे-पेचे इ. (सावट) अशा शब्दांमधून पात्रांची कृती, लकब, वागणं, ढब, लकबी ठळकपणे दिसतात.

**नादानुकारी शब्दांचा वापर :**

कादंबरीतील व्यक्तिरेखांवर त्या समाजातील वातावरणाचा ठसा उमटलेला असतो. ते ते शब्द त्या पात्राशी एकरूप झालेल असतात.

उदा. सपकन्, फटकन, मटकन, खळखळ, भळभळा, डबडबणे, दचकून, पटकन, दगदग इ. (सावट) तर झटकन, टचकन, चकचकीत, घळघळा, धाडकन, धावाधाव इ. (चारापाणी) अशा शब्दांमुळे कथानक गतिमान बनते.

**म्हणी – वाक्प्रचारांचा वापर :**

म्हणी - वाक्प्रचारांमुळे भाषेला जिवंतपणा येतो. आणि भाषा प्रभावी बनते. पात्रांची भावव्यथा स्पष्ट होण्यासाठी म्हणी-वाक्प्रचारांची मदत होते. 'कुणाला कश्याचं आनू बलुत्याला पैशाचं' एवढी एकच म्हण 'चारापाणी' मध्ये येते. तर 'तेल बी गेलं, अन् धुपाटनंबी गेलं' ही म्हण 'सावट' मध्ये येते. म्हणींचा वापरं अधिक प्रमाणात केलेला दिसत नाही.

वाक्प्रचारांचा विचार करता, भिजत घोंगडं ठेवणे, अवघड जागचं दुखणं, केस गुंतणे, डोक्यात किडा शिरणे, पीळ देणे, तळ ठोकणे, नांगर फिरविणे, हवालदिल होणे, नांगी टाकणे, रामराम करणे, उट्टं काढणे, सणक चढणे, हातपायातनं वारं जाणे, अंधारात वार करणे इ. (सावट) तर दात कोरून पोट भरणे, बुचकळ्यात पडणे, डोळ्यात जीव आणणे, कपाळावर आठ्या पडणे, हाता-तोंडाला गाठ पडणे, डोक्यात सणक भरणे, प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाणे, घारीगिधाडाच्या पोटात घालणे, सोताच्या पोळीवर तूप ओढणे, जबान देणे, (चारापाणी) असे वाक्प्रचार जागोजागी आले आहेते. त्यामुळे पात्रांचे स्वभावविशेष अधिक ठसठशीत होतात.

**उपमा, प्रतिक–प्रतिमांचा वापर :**

रा. रं. बोराडे 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांमध्ये काहीवेळा उपमा आणि प्रतिक-प्रतिमांचाही वापर करतात. यामुळे घटनाप्रसंग, पात्रांचे भाव-स्वभाव आशयाला भिडतात. रा. रं. बोराडे असा वापर सहजपणे करतात.

उदा. 'चिपाडावाणी वाळलेला, धगधगीत उन्हात वाळत घालावं तसं, माणसाच्या शरीराला जळू चिपकावा त्याप्रमाणं, डोक्यात सणक भरल्यावनी, एखादी मोलाची वस्तू आणावी तसं, फड जिंकलेल्या पहिलवानाप्रमाणं, एखाद्या सावजावर झडप घालावी तसं, वादळ झेपावत यावं तसं इ. (चारापाणी)

तर 'ओझ्यानं वाकल्यावनी, मारक्या बैलावनी, बाभळीच्या खुरटलेल्या झाडावनी, तोंडाला मिठी पडल्यावनी, अचानक जाग यावं तसं सिनेमाच्या टॉकीजमध्ये शिरावं तसं, जरब बसल्यावनी, डोक्यात गिरमिट पिळावं तसं, पिकात तण वाढावं तसं, छातीत बुक्की मारावी तसे, अंगावरची धूळ झटकावी त्याप्रमाणं, डोळ्याला पाझर फुटल्यावनी, पाण्याचा बंधारा फुटल्यावनी, एखादं मूल रडावं तसं, मुळ्या तुटलेलं झाड उन्मळून पडावं तसं इ. (सावट)

**शिव्या सादृश्य शब्दांचा वापर :**

पात्रांद्वारे राग-लोभ, वृत्ती व्यक्त करण्यासाठी चीड व्यक्त करण्यासाठी असे शिव्या सादृश्य शब्द 'सावट' आणि 'चारापाणी' मध्ये क्वचित प्रसंगी येतात.

उदा. मुडद्यानु, भडवा, ऑफिसमधले बैल इ. (चारापाणी)

झक मारणे असा एखादाच शब्द 'सावट' मध्ये येतो.

**शेतीशी निगडीत शब्दांचा वापर :**

'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्या ग्रामीण जीवनातील शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचं जीवन चित्रित करतात. 'चारापाणी' मध्ये तर शेतीचेच प्रश्न आले आहेत. त्यामुळे कृषिजीवनातील अनेक शब्द कादंबरीमधून येतात. आशयाचा भाग म्हणून हे शब्द कादंबरीमधून येत असतात.

उदा. घंगाळ, टोपलं, पोहरा, बिंदग्या, बाटूक, विहिर, ऊस, नांगरणी, खरीप, गाडीवाट, पाऊलवाट, दावण, पेंढ्या, वैरण, जित्राब, बैलबारदाना, गाय, म्हैस, कालवड, गुरांचा गोठा, मळा, कडबा, बैल, मशागत, पेरणी, गंजी, जिरायती, बागायती, गळीत हंगाम, सापत्या, बैलगाडी अशा शब्दांमधून ग्रामजीवनाचा प्रत्यय येत राहतो.

**इंग्रजी शब्दांचा वापर :**

दळणवळणाची साधने वाढल्याने शहर आणि खेडं यांच्यातील अंतर कमी झालं. परिणामी ग्रामीणांच्या तोंडी अनेक इंग्रजी शब्दही रूळले गेले. 'सावट' आणि 'चारापाणी' मध्ये पेपरवेट, फाईल, ॲक्वायर, स्पेशलकेस, पाईपलाईन, कॅनॉल, बी. डी. ओ., टेबल, ॲक्टिव्हिटीज, प्रपोजल, लिफ्ट, गेस्टहाऊस, कार, चेअरमन, ड्रायव्हर, बिझी, बोअरींग मशीन, बसस्टँड, बालिस्टर, प्रॅक्टिकल, कॉलेज, कोर्ट, जेल, इंजिनिअर, लाईफ इ.

**हिंदी शब्दांचा वापर :**

'सावट' आणि 'चारापाणी' मध्ये काही हिंदी शब्दही मधूनमधून येतात. उदा. परेशान, आदत, फिर्याद, जायदाद, बिमार, याद, वापस, सवाल इ.

**मराठवाडी बोलीभाषेतील शब्दांचा वापर :**

रा. रं. बोराडे यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांना मराठवाड्याची पार्श्वभूमी लाभलेली असल्याने तेथील जनजीवनातील बोलीभाषेतील शब्दांचा प्रभाव कादंबरीतही जाणवतो.

उदा. उलीसंक, उद्यापसवर, कडुसं, आलताव, केलताव, व्हताव, बसलाव, जाताव, निगालाव, हाव, झावळंत, लेकरू इ. एकूणच ग्रामीण जीवनाचे चित्रण करताना एक नवीनच भाषा निर्माण होत असते.

**सारांश :**

प्रस्तुत प्रकरणात रा. रं. बोराडे यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबरींच्या अभिव्यक्तीविशेषांचा विचार केला आहे. कथानक, पात्रचित्रण, संघर्षाचे चित्रण, प्रसंगचित्रण, निसर्गचित्रण आणि भाषाशैली या कादंबरीच्या आवश्यक घटकांद्वारे 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यातील अभिव्यक्तीविशेष लक्षात घेतले.

प्रथमतः 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांच्या कथानकाचा विचार केला 'सावट' च्या कथानकाचा विचार करता, शिकत असणाऱ्या दामाजीला पमाचा (बहिणीचा) सासरा आपल्या अडाणी भाचीसाठी लग्नाची मागणी घालून एक पेचप्रसंग निर्माण करतो. इथूनच कादंबरीत संघर्षाला सुरूवात होते. पमाचा सासरा कॉलेजवरही दामाजीस भेटतो. त्याने लग्नास तयार व्हावे म्हणून धमकीवजा सूचनाही देतो. तरीही मित्रांच्या सल्ल्यानुसार अडाणी मुलगी गळ्यात पडायला नको. कारण संसार विसंवादी होईल, ही भीती, शिवाय लग्न केल्यास शिक्षणात अडथळा आणि नकार दिल्यास बहिणीस सासरी छळ होईल अशा कचाट्यात दामाजी सापडतो. दामाजीने या मागणीकडे दुर्लक्ष केल्याचा परिणाम म्हणून पमाला माहेरी पाठविले जाते. शिक्षणासाठी आधी पाठीशी असणारे वडीलही नंतर बदलतात. मुलीकडे बघून त्यांनाही वाटते की, दामाजीने त्या मुलीशी लग्न करावे. यातून कादंबरीत ताणतणावाचे वातावरण निर्माण होते. जे कादंबरीला पोषक असेच असते. आणि त्यामुळे कथानकही गतिमान बनते.

दामाजीचा मावसभाऊ जयवंतराव याच्या मदतीने पमास सासरी पाठविले जाते. नंतर एक अफवा कानावर येते की, दामाजीस जबरदस्तीने पळवून नेऊन लग्न करणार आहेत. या भीतीपोटीच, कामानिमित्त शहरात आलेल्या पमाच्या गाववाल्याला - यशवंताला दामाजीचे मित्र हातकड्या घालण्याची धमकी देतात. येथे आणखी संघर्षाची ठिणगी पडते. कथानक आणखी वेग घेते. चिडलेला पमाचा सासरा पमाला सवत आणतो आणि तिचं जीवन उध्वस्त होतं. अशाप्रकारचं 'सावट' या कादंबरीचं कथानक गतिमान, संघर्षमय आणि त्यामुळं वाचनीय झाले आहे. वाचकाला अंतर्मुख करण्याचं सामर्थ्य 'सावट' च्या कथानकामध्ये निश्चितच आहे.

'चारापाणी' या कादंबरीचे कथानक पाहता, या कादंबरीचा नायक सुखदेव, द्विपदवीधर तरूण सुट्टीला गावी येतो. तेव्हा आपल्या गावचे दुष्काळी रूप पाहतो. सर्वत्र जनावरांच्या चारापाण्याची, माणसांच्या पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते. दत्तू घायवट हा शेतकरी गाव सोडून जातो. काही जनावरे चारापाण्याविना कसायला विकणं भाग पडतं. तर बाळबासारखा शेतकरी बैलांच्या गळ्यात दाखले बांधतो. त्यांना सांभाळण्यासाठी आबाराव शेळके हा श्रीमंत शेतकरी तयार होतो. यामागे त्याचा काहीतरी स्वार्थ असतो, इथेच या कादंबरीतील संघर्षाला सुरूवात होते, कथानकाला वेग येतो. सुखदेव आबारावाचा धूर्तपणा ओळखतो. त्याच्याकडे उसन्या अथवा कर्जाऊ कडब्याची मागणी करतो. परंतु आबाराव त्यास साफ नकार देतो. परिणामी सुखदेवच्या घरातही संघर्ष सुरू होतो.

गावातील अनेक शेतकरी आपली बैले आबारावाकडे सांभाळी देतात. त्याच्याकडेच शेतीही लावतात आणि त्याचेच रोजगारी म्हणून राबतात. गावातील बैलांच्या चारापाण्यासाठी सुखदेव शासनाची मदत मिळवायचा प्रयत्न करतो. तहसीलदार, बी. डी. ओ., साखर कारखान्याचे चेअरमन, शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते यांना भेटतो. बैलांसाठी ठिकठिकाणी छावण्या कराव्यात म्हणून विनंती करतो. परंतु शेवटी धडपडीअंती लक्षात येतं की शासनव्यवस्था केवळ मलमपट्टीसारखे वरवरचे लक्ष देते. या ग्रामीण लोकांच्या प्रश्नांकडे कोणीच गांभीर्याने पाहत नाही. तसा त्यांना वेळही नसतो, शिवाय गरजही वाटत नाही. दरम्यानच्या काळात सर्जेराव शिंदेच्या चिडलेल्या मुलाने (जयरामने) आबारावाचा कडबा पेटविलेला असतो. त्याचा परिणाम सर्व गावकऱ्यांवर होतो. प्रत्येकाच्या दावणीला बैल परत येतात. शेवटी प्रश्न उरतोच. सुखदेव गावकऱ्यांना त्यांची चूक लक्षात आणून देतो. त्याच्या सल्ल्यानुसार सर्व बैल

तहसीलदार कार्यालयासमोर बांधायचे ठरते. बैलांच्या कपाळावर मागण्यांच्या पाट्या बांधल्या जातात. जणू बैलांचाच मोर्चा निघाल्यासारखा वाटतो. इथे लेखकाने कथानकाचा शेवट कलात्मकतेने केला आहे. त्यामुळे वाचकास विचारप्रवृत्त केलं जातं. मुक्या जीवांच्या मागण्यांना बोलकं रूप येतं. दोन्ही कादंबऱ्यांचे कथानक ग्रामीण जीवनातील समस्यांना केंद्रस्थानी असल्याने ते वाचनीय बनते. काही घटना-प्रसंग तुटक-तुटक वाटतात. तरीही वाचकाला खिळवून ठेवण्यासं सामर्थ्य या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये निश्चितच आहे.

'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यातील पात्रचित्रणामध्ये सोयीसाठी नायकपात्रचित्रण, खलनायक पात्रचित्रण, नातीगोती जपणाऱ्या मुलीच्या अगतिक बापाचं चित्रण आणि ग्रामीण सोशिक स्त्रीपात्रचित्रण असा विचार केला आहे.

दामाजी आणि सुखदेव ही अनुक्रमे 'सावट' आणि 'चारापाणी' मधील नायकपात्रे आहेत. दोन्हीही शिक्षण घेणारे विद्यार्थी आहेत. दुष्काळाने मोडीत निघालेल्या शेतकऱ्यांना उभं करण्याचा प्रयत्न सुखदेव करतो. प्रसंगी कौटुंबिक आणि सार्वजनिक संघर्षाला त्याला सामोरे जावं लागतं. अन्यायासाठी लढणारा, ध्येयासाठी धडपडणारा सुखदेव शेवटी मोर्चाचा मार्ग स्वीकारतो. 'मेखा मारो' आंदोलनाचा आधार घेतो. बैलांनाच स्वतः सहसीलदार ऑफिससमोर उभे करतो. असे हे सर्वव्यापी दृष्टी असलेले, नवे भान आलेले नायकांचे पात्रचित्रण रा. रं. बोराडे करतात. तर 'सावट' चा नायक दामाजी शिक्षण घेत असतानाच लग्नाच्या मागणीने नात्यागोत्यातील भावबंधात गुरफटला जातो. बहिणीच्या सासऱ्याची अडाणी भाची करण्यास नकार दिल्याने सरंजामी मूल्यसरणी असणारा सासरा बहीण पमास 'हत्यार' म्हणून वेठीस धरतो. सर्वच आप्तमंडळी दामाजीचा द्वेष करतात. त्यातच मित्रांनी दिलेली हातकड्याची धमकी त्यास खूपच महागात पडते. धमकीमुळे पमाला सवत आणली जाते. परिणामी दामाजीचं शिक्षणावरचं लक्ष विचलीत होते. त्याच्या मनाची झालेली कोंडी लेखकाने अतिशय समर्थपणे उभी केली आहे. त्याचं पात्रचित्रण एक संयमी, समंजस, आज्ञाधारक तसेच जुन्या-नव्या विचारांच्या सीमारेषवर वावरणारा म्हणून बोराडे करतात.

खलनायक पात्रांमध्ये आबाराव शेळके आणि बळवंतराव हे अनुक्रमे 'चारापाणी' आणि 'सावट' मध्ये येतात. दोघेही श्रीमंत, गडगंज, सरंजामी वृत्ती नसानसात भिनलेले आहेत. आबाराव हा दुष्काळी परिस्थितीचा फायदा घेतो. माणसाच्या शरीराला जळू चिपकावा त्याप्रमाणे तो गावाचे शोषण करतो. त्याचं चित्रण बोराडे चतुर, स्वार्थी, धोरणी, आतल्या

गाठीचा असे करतात. दुष्काळाप्रमाणेच शेतकऱ्यांकडे तोही 'काळ'च असल्याचं बोराडे चित्रण करतात, तर 'सावट' मधील बळवंतराव हा बेरकी, स्वार्थी, धोरणी असा आहे. त्याचा 'अहंम्' दुखावताच त्याच्यातील सरंजामी वृत्ती जागी होते. एक क्रूर, हट्टी, आडदांड अशा प्रकारचं या खलपात्राचं चित्रण येते.

नातीगोती जपणाऱ्या मुलींच्या अगतिक बापांचे चित्र अंबादासराव आणि नारायणराव यांच्याद्वारे रा. रं. बोराडे करतात. कोणत्याही कारणामुळे आपल्या मुलीला सासरी त्रास होऊ नये ही भूमिका त्यांची असते. म्हणून ही पात्रे महत्त्वाची वाटतात. तर ग्रामीण सोशिक स्त्रीपात्रचित्रण राहीबाई, माय, पमा यांच्याद्वारे रा. रं. बोराडे करतात. राहीबाई, माय ह्यांना आपल्या संसाराबरोबरच मुलांच्या संसाराचीही काळजी आहे. म्हणून त्या व्याही लोकांची मनधरणी करतात. पमाच्याद्वारे ग्रामीण जीवनात असणाऱ्या साठलोठं लग्नपद्धतीत बळी पडलेल्या 'सून' आणि 'लेक' या घटकाचं चित्रण येते. एकूणच ही स्त्रीपात्रे सोशिक, सहनशीलवृत्ती असणारी अशीच लेखकाने चित्रित केलेली आहेत. पुरूषी वर्चस्वाला बळी गेलेलं पात्र म्हणून 'पमाचं' चित्रण बोराडे करतात.

'सावट' आणि 'चारापाणी' तून रा. रं. बोराडे अनेक घटना-प्रसंगाचं चित्रण करतात. हे प्रसंग वाचकाच्या डोळ्यांसमोर जसेच्या तसे उभं करण्याचा लेखकाचा प्रयत्न दिसतो. 'सावट' मधील पमाच्या लग्नातील दामाजीसंदर्भात घडलेला प्रसंग, पमाला माहेरी पाठविल्याचा प्रसंग, तिला सवत आणल्याचा प्रसंग तसेच 'चारापाणी' मध्ये बाळबा शेलारने बैलांच्या गळ्यात दाखले बांधल्याचा प्रसंग, आबारावने बैले संभाळी घेतल्याचा प्रसंग, जावयाची जनावरे संभाळी पाठवल्याचा प्रसंग, रामा सुराशेची बायको विहिरीत पडल्याचा प्रसंग असे अनेक प्रसंग चित्रित करण्यात रा. रं. बोराडे यांना यश आले आहे.

निसर्गचित्रणही 'सावट' आणि 'चारापाणी' कादंबरीमध्ये कमी-अधिक प्रमाणात बोराडे करतात. निसर्गचित्रणामुळे कादंबरीच्या कथानकाला उठावदारपणा येतो. 'चारापाणी' मधून दुष्काळाच्या छायेमुळे उजाड, ओसाड निसर्गाचं चित्रण येते. तर 'सावट' मध्ये लेखकाने माणसांच्या अंतर्गत ताणतणावावर अधिक भर दिल्याने निसर्गचित्रण जास्त येत नाही. त्याविषयी कुठेतरी एखादा संदर्भ येऊन जातो.

'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांच्या भाषाशैलीचा विचार करता, निवेदनाची भाषा आणि संवादाची भाषा असा विचार केला आहे. 'सावट' चे निवेदन प्रथमपुरूषी तर

'चारापाणी' चे निवेदन तृतीयपुरूषी आहे. दोन्हीही कादंबऱ्यांच्या निवेदनात ग्रामीण-नागर संमिश्रता आढळते. मात्र संवाद ग्रामीण बोलीत येतात. अन्य भाषाविशेषामध्ये सादशब्द, नादानुकारी शब्द, म्हणी, वाक्प्रचार, उपमा, प्रतिक-प्रतिमांचा वापर, शिव्या-सादृश्य शब्द, शेतीशी निगडीत शब्द, इंग्रजी-हिंदी शब्द, मराठवाडी बोलीतील शब्द कादंबरींमध्ये आले आहेत, त्यांचीही वर्गवारी केली आहे.

**समारोप :**

अशाप्रकारे 'सावट' आणि 'चारापाणी' या रा. रं. बोराडेंच्या कादंबऱ्यांचे अभिव्यक्ती विशेष लक्षात घेतले. त्यामध्ये कथानक, पात्रचित्रण, प्रसंगचित्रण, निसर्गचित्रण आणि भाषाशैली इ. घटकांचा विचार केला. यामध्ये गतिमान निवेदन, कथावस्तूवर जबरदस्त पकड, संवादावर भर, फाफटपसाऱ्याचा अभाव, नवे ग्रामीण शब्द वापरण्याची लकब, ग्रामीण बोलीचा कलात्मक वापर अशी अभिव्यक्तीची वैशिष्ट्ये 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांत आढळतात. पुढील प्रकरणात मागच्या सर्व प्रकरणांचा थोडक्यात सारांश पहावयाचा आहे.

## संदर्भ टीपा


१) प्र. वा. बापट, ना. वा. गोडबोले 'मराठी कादंबरी' (तंत्र आणि विकास), पृ. ८९

२) अविनाश डोळस 'घरशिवार' (संपा. चंद्रकुमार नलगे), पृ. २२७

३) मधू जामकर 'घरशिवार' (सं. चंद्रकुमार नलगे) पृ. १३१-१३२

४) सुधा जोशी लेख - 'सावट' - दलित वाङ्मयाची चढती कमान

५) द. ता. भोसले 'घरशिवार' (संपा. चंद्रकुमार नलगे), पृ. ११८

६) भीमराव वाघचौरे 'रा. रं. बोराडे यांचे साहित्य : स्वरूप आणि आस्वाद', पृ. २०५

७) या. वा. वाडस्कर 'घरशिवार' (संपा. चंद्रकुमार नलगे), पृ. ५८

८) इंद्रजित भालेराव दै. लोकमत, साहित्यजत्रा, औरंगाबाद,

९) भीमराव वाघचौरे 'रा. रं. बोराडे यांचे साहित्य : स्वरूप आणि आस्वाद', पृ. १८४-१८५